# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## सुविचार

संस्कार म्हणजे केवळ शिकवण नाही, तर आचरणातून दिसणारी मूल्यांची अमूल्य शिदोरी आहे; जी माणसाला संकटातही माणूस म्हणून उभे राहायला शिकवते.

## सरमा यांच्याकडून चिंता व्यक्त

**नवी दिल्ली :** आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी मंगळवारी बांगलादेशात हिंदू समुदायावर होत असलेल्या हत्यांबाबत तीव्र चिंता व्यक्त केली. बांगलादेशातील परिस्थिती विशेषतः हिंदूंवरील वाढते हल्ले गंभीर असून, ही स्थिती केवळ त्या देशापुरती मर्यादित न राहता त्याचे पडसाद भारतात, विशेषतः आसाममध्येही उमटू शकतात, असे त्यांनी सांगितले. त्यामुळे सतर्क राहणे आवश्यक आहे, असे सरमा यांनी स्पष्ट केले.



## सारांश वृत्त

### तरुणाच्या हत्येप्रकरणी तिघांना अटक

**नवी दिल्ली :** ईशान्य दिल्लीतील वेलकम परिसरात जुन्या वादातून १८ वर्षीय तरुणाचा चाकूने वार करून खून केल्याच्या आणि दुसऱ्याला गंभीर जखमी केल्याच्या आरोपाखाली तीन जणांना अटक करण्यात आली आहे, असे पोलिसांनी सांगितले. सुहेल उर्फ जादू (२०), इल्मान (२२) आणि रिजवान उर्फ किडा अशी आरोपींची ओळख पटली आहे. पोलिसांनी सांगितले की, मृत आणि जखमी तरुणाशी त्यांचा बराच काळ वाद होता. मृताचे नाव अरमान (१८) असे आहे, तो वेलकमचा रहिवासी होता.

### विनय कटियार राजकारणात परतणार

**अयोध्या (उत्तर प्रदेश) :** रामजन्मभूमी चळवळीच्या सुरुवातीपासूनच त्याच्याशी जोडलेले विनय कटियार यांनी मंगळवारी सांगितले की ते २०२७ ची उत्तर प्रदेश विधानसभेची निवडणूक अयोध्या विधानसभा मतदारसंघातून लढवतील. पत्रकारांशी बोलताना, कुर्मी समुदायाचे कटियार म्हणाले की, अयोध्या ही त्यांची कर्मभूमी आहे आणि ते २०२७ ची निवडणूक तिथून लढवतील. १९९१, १९९६ आणि १९९९ च्या निवडणुकीत फैजाबाद मतदारसंघातून ते लोकसभेवर निवडून आले होते.

### घरफोडीप्रकरणी चौघांना अटक

**बेंगळुरू :** येथील एका घरातून १.०३ कोटी रुपयांचे सोनेरी दागिने, चांदीच्या वस्तू आणि रोख रक्कम चोरल्याच्या आरोपाखाली चार जणांना अटक करण्यात आली, असे पोलिसांनी मंगळवारी सांगितले. ही घटना वडेरहल्ली येथील हेसरघट्टा मेन रोडवरील एका व्हिलामध्ये घडली जेव्हा ते बाहेरगावी गेले होते, असे पोलिसांनी सांगितले.

## निवडणूक पूर्व सर्वेक्षणातील अंदाज समोर

# सुरेश कलमाडी अनंतात विलिन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे : पुण्याचे माजी खासदार, केंद्रीय राज्यमंत्री आणि ऑलिम्पिक महासंघाचे माजी अध्यक्ष सुरेश कलमाडी (८१ वर्षे) यांचं पुण्यात आज निधन झाले. दरम्यान, दुपारी ४ वाजता त्यांच्यावर वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.**



काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री असलेल्या कलमाडींच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, त्यांच्या पती-पत्नी व नातवंडांचा परिवार आहे. पहाटे साडेतीनच्या सुमारास प्रदीर्घ आजारामुळे उपचार घेत असताना त्यांची प्राणज्योत मालवली. सुरेश कलमाडी यांच्या निधनामुळे पुण्यातील राजकीय वर्तुळावर शोककळा पसरली आहे.

कलमाडी भारतीय ऑलिंपिक असोसिएशनचे माजी अध्यक्ष होते आणि त्यांच्या दीर्घ कारकिर्दीत भारतीय खेळ क्षेत्राला मोठे यश मिळाले, तरी त्याचबरोबर हाय-प्रोफाइल भ्रष्टाचार प्रकरणांमध्ये त्यांचे नावही आले. १ मे १९४४ रोजी तामिळनाडूमध्ये जन्मलेल्या कलमाडींचे शिक्षण पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजमध्ये झाले.

राजकारणात येण्यापूर्वी, त्यांनी खडकवासला येथील राष्ट्रीय संरक्षण अकादमी (एनडीए) मध्ये प्रशिक्षण घेतले आणि १९६४ ते १९७४ पर्यंत भारतीय हवाई दलात सेवा बजावली. त्यांनी १९६५ व १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्ध तसेच १९६६ मध्ये मिझो नॅशनल फ्रंट उठावादरम्यान ऐझॉलवर झालेल्या हवाई हल्ल्यात भाग घेतला. त्यांच्या कार्यकाळात अनेक पदके मिळाली, नंतर त्यांनी राजकारणाकडे वळण घेतले. १९८२ मध्ये, शरद पवारांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी काँग्रेस (एस) तर्फे राज्यसभेवर निवडून येऊन १९८८, १९९४ आणि १९९८ मध्ये पुनर्निवड घेतली. १९९५ मध्ये पी. व्ही. नरसिंह राव सरकारमध्ये त्यांनी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री म्हणून काम पाहिले. १९९६ मध्ये पुणे लोकसभेवर निवडून आले, परंतु पुढील सार्वत्रिक निवडणुकीत पराभूत झाले; २००४ व २००९ मध्ये त्यांनी पुन्हा परती केली.

कलमाडींच्या कारकिर्दीत, काँग्रेसमध्ये त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. १९९१ मध्ये शरद पवारांनी पंतप्रधानपदासाठी पी. व्ही. नरसिंह राव यांच्याशी स्पर्धा करताना कलमाडी यांना खासदार आणि वरिष्ठ नेत्यांसोबत संपर्क साधण्याची जबाबदारी सोपवली होती. त्यांच्या पक्षपातळ्या ओलांडून माजी पंतप्रधान अटलबिहारी वायपईसहही त्यांची मैत्री होती.

कलमाडी हे भारतीय क्रीडा प्रशासक म्हणूनही प्रभावी ठरले.



त्यांनी १९८७ ते २००६ पर्यंत ॲथलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष राहून देशात अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धा आयोजित केल्या. १९९६ मध्ये भारतीय ऑलिंपिक असोसिएशनचे अध्यक्षपद स्वीकारले आणि १५ वर्षांपर्यंत कार्यरत राहिले, ज्या काळात २००८ बीजिंग ऑलिंपिकमध्ये नेमबाज अभिनव बिंद्राने भारतासाठी पहिले वैयक्तिक सुवर्णपदक जिंकले. त्यांच्या अध्यक्षत्वात २००८ राष्ट्रकुल खेळांसाठी निधीवापराच्या आरोपांमुळे त्यांना निलंबितही केले गेले; २०११ मध्ये अटक झाली आणि २०१६ मध्ये पुन्हा भारतीय ऑलिंपिक असोसिएशन अध्यक्षपदी निवड झाली, परंतु जनतेच्या रोषामुळे राजीनामा द्यावा लागला. भारतीय क्रीडा क्षेत्रातील यशस्वी आयोजन, राष्ट्रीय खेळांचे पुनरुज्जीवन आणि आंतरराष्ट्रीय क्रीडा स्तरावर भारताची प्रतिष्ठा वाढवण्यात राहिला, जरी त्यांचा कारकिर्दीत वाद आणि आरोपही उपस्थित होते. त्यांच्या निधनाने भारतीय खेळ आणि राजकारणात एक युग संपल्याचे म्हणता येईल.

# पुणे रेल्वे स्थानकाचा चेहरामोहरा बदलणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे रेल्वे स्थानकाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी रेल्वे प्रशासनाने व्यापक मास्टर प्लॅन तयार केला असून, त्याअंतर्गत पुढील काही वर्षांत सुमारे ६० नवीन रेल्वेगाड्या सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. वाढत्या प्रवासी संख्येचा विचार करता ही योजना आखण्यात आली असून, यामुळे पुणे आणि परिसरातील दैनंदिन प्रवास अधिक सुलभ होण्याची अपेक्षा आहे.

या मास्टर प्लॅनमध्ये पुणे रेल्वे स्थानकावर सहा नवीन प्लॅटफॉर्म उभारण्याचा समावेश आहे. सध्या उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधांवर मोठा ताण असल्याने प्लॅटफॉर्मची संख्या वाढवून गाड्यांची ये-जा अधिक सुरळीत करण्याचा उद्देश आहे. त्याचबरोबर विद्यमान काही प्लॅटफॉर्मची लांबी वाढवण्याचाही प्रस्ताव आहे, जेणेकरून लांब पल्ल्याच्या गाड्यांचे थांबे सुलभ होतील.

नवीन गाड्या सुरू झाल्यानंतर पुणे विभागातील रेल्वे सेवांची संख्या लक्षणीयरीत्या वाढणार आहे. त्यामुळे दररोज प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशांना अधिक पर्याय उपलब्ध होतील आणि गर्दीचा प्रश्न काही प्रमाणात कमी होईल.

पुणे स्थानकावर वाढणारा ताण कमी करण्यासाठी सॅटेलाइट टर्मिनल्स उभारण्यावरही भर देण्यात आला आहे. आळंदी, उरुळी कांचन आणि फुरसुंगी या भागांमध्ये कोचिंग टर्मिनल्स विकसित करण्याची योजना असून, काही गाड्या या ठिकाणांहून सुरू किंवा संपवण्याचा विचार आहे.

## अल्पसंख्याक हिंदू समाजाच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित

# बांगलादेशात २४ तासांत दोन हिंदूंच्या हत्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ढाका :** बांगलादेशात गेल्या २४ तासांत दोन हिंदू नागरिकांच्या हत्या झाल्या असून, मागील १८ दिवसांत हा सहावा बळी ठरला आहे. या घटनांमुळे देशातील अल्पसंख्याक हिंदू समाजाच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

नरसिंगडी जिल्ह्यातील चारसिंदूर बाजारात किराणा दुकान चालवणारे मणी चक्रवर्ती यांच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी भर बाजारात धारदार शस्त्राने हल्ला केला. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले आणि उपचारांपूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. विशेष म्हणजे, १९ डिसेंबर रोजी मणी चक्रवर्ती यांनी



सोशल मीडियावर बांगलादेशातील वाढत्या हिंसाचाराबद्दल चिंता व्यक्त करणारी पोस्ट केली होती. आपल्या परिसराला त्यांनी 'मृत्यूची दरी' असे संबोधले होते.

याच दिवशी जेसोर जिल्ह्यातही आणखी एका हिंदू नागरिकाची हत्या झाली. राणा प्रताप बैरागी असे मृत व्यक्तीचे नाव असून ते मोनिरामपूर परिसरात बर्फाचा कारखाना चालवत होते. ते दैनिक बीडी खबर या वृत्तपत्राचे कार्यकारी संपादकही होते. मोटारसायकलवर आलेल्या तीन हल्लेखोरांनी त्यांना कारखान्यातून बाहेर बोलावून एका अरुंद गल्लीत नेले आणि जवळून डोक्यात गोळी झाडून फरार झाले. त्यांचा जागीच मृत्यू झाला.

गेल्या काही दिवसांपासून बांगलादेशात हिंदूंवरील हल्ल्यांची मालिका सुरू आहे. १२ डिसेंबरला विद्यार्थी नेता शरीफ उस्मान हादी यांच्या मृत्यूनंतर देशात हिंसाचार वाढला आणि त्यात अल्पसंख्याक हिंदूंना लक्ष्य केले जात असल्याचे चित्र दिसत आहे. उत्तर बांगलादेशातील मैमनसिंग जिल्ह्यात कपड्याच्या कारखान्यात काम करणाऱ्या २७ वर्षीय दीपू चंद्रा दास यांना जमावाने बेदम मारहाण करून ठार मारण्यात आले होते. त्यानंतर वेगवेगळ्या ठिकाणी आणखी तीन हिंदू नागरिकांच्या जमावाकडून हत्या झाल्या.

२४ डिसेंबर २०२५ रोजी दीपू दास, २६ डिसेंबरला अमृत मंडल, १ जानेवारी २०२६ रोजी बजेंद्र बिस्वास, ४ जानेवारीला खोकेनचंद्र दास, ५ जानेवारीला राणा प्रताप बैरागी आणि मणी चक्रवर्ती यांची हत्या झाली आहे. या सलग घटनांमुळे बांगलादेशातील हिंदू समाज भीतीच्या वातावरणात जगत आहे. अल्पसंख्याकांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना होत नसल्याचा आरोप युनूस सरकारवर केला जात आहे. यामुळे भारतातही तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. आगामी १२ फेब्रुवारीला होणाऱ्या संसदीय निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतविरोधी आणि हिंदूविरोधी मुद्दे राजकारणात केंद्रस्थानी आले असल्याचे चित्र आहे. या परिस्थितीत बांगलादेशातील हिंदूंच्या सुरक्षेचा प्रश्न अधिकच गंभीर बनला असून, हे हल्ले कधी थांबणार असा सवाल उपस्थित केला जात आहे.

# मनपात भाजपसमोर राष्ट्रवादीचे आव्हान

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून नेत्यांना सूचना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे महानगरपालिका निवडणुकीत शंभरहून अधिक जागा जिंकण्याचे उद्दिष्ट ठेवलेल्या भारतीय जनता पक्षासमोर आता मित्रपक्ष राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कडूनच कडवे आव्हान उभे राहिले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आखलेली निवडणूक रणनीती, तसेच शरद पवार गटाशी पडद्यामागे जुळवून घेतलेली समीकरणे यामुळे भाजपच्या गोटात अस्वस्थता वाढल्याचे चित्र आहे. काही खाजगी आणि शासकीय सर्वेक्षणांमध्ये भाजपची कामगिरी अपेक्षेप्रमाणे दिसत नसल्याने, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यातील वरिष्ठ नेत्यांवर नाराजी व्यक्त केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

अजित पवार यांनी भाजपमधील काही नाराज आणि बंडखोर नेत्यांना आपल्या गटात सामावून घेऊन त्यांना



उमेदवारी दिल्यामुळे अनेक प्रभागांत भाजपची मते फुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या अनपेक्षित हालचालीमुळे भाजपचे 'मिशन १०० प्लस' अडचणीत आले असल्याचे बोलले जात आहे. सर्वेक्षणातून समोर आलेल्या प्रतिकूल आकडेवारीनंतर भाजप नेतृत्वाने परिस्थिती गांभीर्याने घेतल्याचे संकेत मिळत आहेत.

रविवारी कात्रज येथे झालेल्या जाहीर सभेत देवेंद्र फडणवीस यांनी थेट नाव न घेता अजित पवारांच्या जुन्या राजकीय कार्यपद्धतीवर टीकास्त्र सोडले. मात्र, खरी राजकीय हालचाल सभा संपल्यानंतर पाहायला मिळाली. विमानतळाकडे रवाना होताना फडणवीस, खासदार मुरलीधर मोहोळ आणि मंत्री चंद्रकांत पाटील एकाच वाहनात एकत्र आले. चंद्रकांत पाटील आल्यानंतर फडणवीसांनी स्वतः मुरलीधर मोहोळ यांना बोलावण्यास सांगितल्याचे आणि त्यानंतर तातडीने तिघांची बैठक ठरल्याचे सांगितले जाते.

विमानतळावर या तिन्ही नेत्यांमध्ये बंद दाराआड सविस्तर चर्चा झाली. या बैठकीत फडणवीस यांनी पुण्यातील सर्व १६५ प्रभागांचा सखोल आढावा घेतला. ज्या ठिकाणी भाजपची स्थिती कमकुवत आहे किंवा जिथे सर्वेक्षणांचे निष्कर्ष प्रतिकूल आहेत, त्या प्रभागांमध्ये तात्काळ रणनीतीत बदल करण्याचे निर्देश त्यांनी दिले. कोणत्याही परिस्थितीत लक्ष्य गाठण्यासाठी सज्ज राहा आणि निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही, अशा कडक शब्दांत स्थानिक नेतृत्वाला इशारा देण्यात आल्याचे सूत्रांकडून सांगण्यात येते.

# बीडमध्ये दिवसाढवळ्या थरार कंत्राटी कर्मचाऱ्याची हत्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बीड :** गेल्या काही दिवसांपासून शांत असलेल्या बीड शहरात आज दुपारी पुन्हा एकदा रक्ताचा सडा पडला. शहरातील अंकुश नगर भागात एका ३५ वर्षीय तरुणाची अज्ञात हल्लेखोरांनी अत्यंत निर्घृणपणे हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. हल्लेखोर केवळ गोळीबार करूनच थांबले नाहीत तर त्याचा पाठलाग करून नंतर त्याच्यावर तीक्ष्ण हत्याराने वार करून त्याचा खून केला. मृत बीड नगर पालिकेत कंत्राटी कर्मचारी म्हणून काम करत होता. या हत्येमागील कारण समोर आले नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, हर्षद तुळशीराम शिंदे (वय ३५ , रा. धानोरा रोड, हाउसिंग कॉलनी, बीड) हा तरुण बीड नगरपालिकेत प्लंबिंगचे काम करत होता. आज दुपारी २ वाजण्याच्या सुमारास तो अंकुश नगर येथील शिवाजीनगर रोडवर आपल्या कामात व्यस्त होता. यावेळी दबा धरून बसलेल्या अज्ञात हल्लेखोरांनी त्याच्यावर अचानक हल्ला चढवला. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, हल्लेखोरांनी सुरुवातीला हर्षदवर दोन गोळ्या झाडल्या. गोळीबाराच्या आवाजाने परिसरात एकच धावपळ उडाली. जखमी अवस्थेत स्वतःचा जीव वाचवण्यासाठी हर्षद जवळच असलेल्या एका पत्र्याच्या शेडच्या मागे धावत गेला. मात्र, हल्लेखोराने त्याचा पाठलाग सोडला नाही. त्या ठिकाणी त्याला गाठून हल्लेखोराने धारदार शस्त्राने त्याच्यावर सपासप वार केले. यात हर्षद याचा जागीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. घटनेचे गांभीर्य ओळखून बीडचे अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस उपाधीक्षक पूजा पवार, आणि पोलीस निरीक्षक बांगर यांनी घटनास्थळाची पाहणी केली. परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# त्या फाईल बाहेर काढल्या तर महागात पडेल

## बावनकुळे यांचा अजित पवारांना इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पिंपरी-चिंचवडमधील राजकीय वक्तव्यांवरून उपमुख्यमंत्री अजित पवार आणि भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांच्यात शाब्दिक चकमक रंगताना दिसत आहे. अजित पवारांच्या अलीकडील वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना बावनकुळेंनी अप्रत्यक्ष इशारा देत, जुनी प्रकरणे उकरून काढली तर अजित पवारांनाही बोलणे कठीण जाईल, असे सूचित केले.

बावनकुळे म्हणाले की, अजित पवारांवरील ७० हजार कोटी रुपयांच्या कथित प्रकरणाची सुनावणी अद्याप न्यायालयात सुरू आहे आणि त्यावर कोणताही अंतिम निकाल लागलेला नाही. "न्यायालयीन प्रक्रिया सुरू असताना या मुद्द्यावर सार्वजनिक वक्तव्य करणे योग्य नाही. अजित पवार हे



प्रगल्भ आणि अनुभवी नेते आहेत. इतक्या छोट्या निवडणुकीसाठी अशा बाबी समोर आणून महायुतीत मनभेद निर्माण होऊ नयेत. महायुतीच्या समन्वय बैठकीत एकमेकांविरोधात वक्तव्य टाळण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तरीही अजित पवारांनी अशी विधाने का केली, याचे आश्चर्य वाटते. "मी त्यांना सल्ला देण्याइतका मोठा नाही, पण महायुतीतील ऐक्य महत्त्वाचे आहे. अशा वक्तव्यांमुळे गैरसमज निर्माण होऊ शकतात," असेही त्यांनी नमूद केले.

बावनकुळे यांनी पिंपरी-चिंचवडमधील अजित पवारांच्या दीर्घ सत्ताकाळाचा उल्लेख करताना, "आम्ही जर मागची पाने उलटली, तर त्यांनाही फारसे बोलता येणार नाही," असा इशारा दिला. सध्या ही वेळ आरोप-प्रत्यारोपांची नसून संयम राखण्याची आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड येथे झालेल्या पत्रकार परिषदेत अजित पवारांनी भाजपवर टीका केली होती. आपल्यावर ७० हजार कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराचे आरोप झाले होते, याची आठवण करून देत, "ज्यांनी माझ्यावर आरोप केले, त्यांच्याच सोबत आज मी सरकारमध्ये बसलो आहे," असा सवाल त्यांनी उपस्थित केला होता.

## एसआयआर प्रक्रियेदरम्यानची सर्वात मोठी आकडेवारी

# उत्तर प्रदेशात २.८९ कोटी मतदार यादीतून वगळले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** मतदार यादीच्या विशेष सघन पुनरावृत्ती (एसआयआर) प्रक्रियेनंतर मंगळवारी प्रसिद्ध झालेल्या मसुदा मतदार यादीतून उत्तर प्रदेशातील मोठ्या संख्येने मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. राज्यातील एकूण मतदारांपैकी १८.७० टक्के, म्हणजेच सुमारे २.८९ कोटी मतदार या मसुदा यादीत स्थान मिळवू शकलेले नाहीत. एसआयआरच्या सुरुवातीच्या टप्प्यानंतर मतदार वगळण्याच्या बाबतीत उत्तर प्रदेश देशात पहिल्या क्रमांकावर असल्याचे चित्र आहे.

मुख्य निवडणूक अधिकारी



नवदीप रिनवा यांनी सांगितले की, यापूर्वीच्या यादीत असलेल्या १५.४४ कोटी मतदारांपैकी १२.५५ कोटी मतदारांची नावे नव्या मसुदा यादीत समाविष्ट करण्यात आली आहेत. ही यादी राज्यातील सर्व ७५ जिल्हे आणि ४०३ विधानसभा मतदारसंघांना लागू आहे.

रिनवा यांच्या मते, मृत्यू, कायमस्वरूपी स्थलांतर तसेच दुहेरी नोंदणी यांमुळे २.८९ कोटी मतदारांचा समावेश करता आलेला नाही. यामध्ये ४६.२३ लाख मतदार मृत असल्याचे आढळले, तर २.५७ कोटी मतदार कायमचे स्थलांतरित झालेले किंवा पडताळणीदरम्यान उपलब्ध नसल्याचे नोंदले गेले. याशिवाय २५.४७ लाख मतदार एकाहून अधिक ठिकाणी नोंदणीकृत असल्याचे आढळून आले आहे.

मसुदा यादीवर दावे आणि हरकती नोंदवण्यासाठी ६ जानेवारीपासून ६ फेब्रुवारीपर्यंत एक महिन्याचा कालावधी देण्यात आला आहे. या कालावधीत मतदारांना नाव समाविष्ट करणे, दुरुस्ती करणे किंवा आक्षेप नोंदवण्याची संधी मिळणार आहे.

निवडणूक आयोगाने या प्रक्रियेसाठी घरोघरी जाऊन पडताळणी मोहीम राबवली होती. या मोहिमेत मतदार किंवा त्यांच्या कुटुंबीयांकडून फॉर्म भरून स्वाक्षरी घेण्यात आली.

ही प्रक्रिया मूळतः ११ डिसेंबरपर्यंत पूर्ण होणार होती, मात्र मोठ्या प्रमाणावर मतदार वगळले जात असल्याचे लक्षात आल्यानंतर राज्याने १५ दिवसांची मुदतवाढ मागितली. त्यानुसार ही प्रक्रिया २६ डिसेंबरपर्यंत वाढवण्यात आली.

२७ ऑक्टोबर २०२५ च्या यादीतील १५.४४ कोटी मतदारांपैकी १२.५५ कोटी मतदारांचे अर्ज प्राप्त झाले असून, हे प्रमाण ८१.३० टक्के आहे. मसुदा यादी जाहीर करण्यात विलंब होण्यामागे मतदान केंद्रांची पुनर्रचना आणि समांतर फील्डवर्क कारणीभूत ठरल्याचे रिनवा यांनी स्पष्ट केले.

मतदान केंद्रांवरील मतदारसंख्या १,५०० वरून १,२०० करण्याच्या आयोगाच्या निर्देशांनुसार राज्यात सुमारे १५,०३० नवीन मतदान केंद्रे स्थापन करण्यात आली. या संपूर्ण प्रक्रियेत १.७२ लाखांहून अधिक बूथचा समावेश होता. तसेच मान्यताप्राप्त राजकीय पक्षांनी नियुक्त केलेल्या ५.७६ लाखांहून अधिक बूथ-स्तरीय एजंटांनी या मोहिमेला सहकार्य केल्याची माहितीही त्यांनी दिली.

# काँग्रेस नेत्यावर हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अकोला :** अकोला जिल्ह्यातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष हिदायत पटेल यांच्यावर अकोट तालुक्यातील माहोळ गावात मंगळवारी अज्ञात व्यक्तींनी धारदार शस्त्रांनी प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे. पोटात आणि मानेवर खोल जखमा झाल्याने त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हिदायत पटेल माहोळ गावात असताना काही हल्लेखोरांनी त्यांना अचानक घेरले आणि धारदार शस्त्रांनी सपासप वार केले. भरदिवसा झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या पटेल यांना तातडीने अकोट येथील रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, अतिरक्तस्राव आणि जखमांची तीव्रता पाहता प्राथमिक उपचारांनंतर त्यांना अकोला शहरातील मोठ्या रुग्णालयात हलवण्यात आले.

हल्ल्याची बातमी पसरताच अकोला आणि अकोट परिसरातील काँग्रेस कार्यकर्ते मोठ्या संख्येने रुग्णालयात दाखल झाले. कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संतापाची भावना दिसून येत असल्याने, कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पोलिसांनी अकोला तसेच माहोळ गावात अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी पोलिसांनी विविध पथके रवाना केली असून, हल्लेखोरांचा शोध युद्धपातळीवर सुरू असल्याचे प्रशासनाने सांगितले आहे.

## संपादकीय

### प्रभावी पर्वाचा अस्त

**संघटनकौशल्य, प्रशासनाची जाण आणि क्रीडा क्षेत्रातील योगदानामुळे कलमाडी यांनी पुणे शहरावर आपला ठसा उमटवला असला, तरी कॉमनवेल्थ प्रकरणाने त्यांची राजकीय कारकीर्द उद्‌ध्वस्त झाली. त्यांचा प्रवास हा व्यवस्थेतील वास्तव अधोरेखित करणारा ठरतो.**



सुरेशभाई कलमाडी यांच्या निधनाने पुण्याच्या आणि महाराष्ट्राच्या राजकारणातील एक दीर्घ, वादग्रस्त तथापि प्रभावी पर्व संपले आहे. दीर्घ आजाराने त्यांची प्राणज्योत मालवली, तेव्हा त्यांच्या आयुष्याबरोबरच एका विशिष्ट राजकीय शैलीचाही अंत झाला, असे म्हणावे लागेल. सुरेश कलमाडी हे केवळ काँग्रेसचे वरिष्ठ नेते किंवा माजी केंद्रीय मंत्री नव्हते; तर ते पुण्याच्या सार्वजनिक जीवनावर अनेक दशकं ठसा उमटवणारे व्यक्तिमत्त्व होते. वायुदलातील पायलट म्हणून कारकीर्द सुरू करणारी ही व्यक्ती राजकारणात आली आणि दीर्घकाळ ती संसदेत होती, ही बाबच त्यांच्या प्रवासाची व्यापकता सांगणारी आहे. राज्यसभेपासून लोकसभेपर्यंत, केंद्रीय मंत्रिपदापासून पुण्याचा सर्वेसर्वा अशी ओळख मिळेपर्यंतचा त्यांचा हा प्रवास सोपा अजिबात नव्हता. संघटन कौशल्य, प्रशासनाची जाण आणि संपर्कांचा वापर कसा करायचा, हे कलमाडी यांना अचूकपणे उमगले होते. त्यामुळेच पुणे शहराच्या राजकारणात त्यांचा दबदबा दीर्घकाळ टिकून राहिला. क्रीडा प्रशासन हा त्यांच्या कारकिर्दीचा महत्त्वाचा पैलू होता, असे म्हणता येईल. भारतीय ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्षपद, पुणे फेस्टिव्हल, पुणे मॅरेथॉन यांसारख्या उपक्रमांमधून त्यांनी शहराला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर नेण्याचा प्रयत्न केला. पुणे शहराचा गणेशोत्सव आंतरराष्ट्रीय पातळीवर आला तो पुणे फेस्टिव्हल १९८९ पासून आयोजित करणारे नेते म्हणजे सुरेशभाई कलमाडी. दरवर्षी गणेशोत्सवादरम्यान आयोजित होणारा हा महोत्सव भारतीय शास्त्रीय संगीत, नृत्य आणि कलांचे मोठे व्यासपीठ बनले आहे. बालेवाडीसारख्या ओसाड, एकाकी असलेल्या गावात स्टेडियमची बांधणी करून, १९९४ मध्ये त्याला खेळाच्या नकाशावर अग्रक्रम देणारे नेते म्हणजेच, सुरेशभाई कलमाडी. बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल उभारण्यात आले. कलमाडी यांच्या पुढाकाराने हे भव्य स्टेडियम केवळ एका वर्षाच्या विक्रमी वेळेत पूर्ण करण्यात आले. भारतात धावण्याची संस्कृती रुजवण्यासाठी त्यांनी २५ सप्टेंबर १९८३ मध्ये पहिली 'पुणे इंटरनॅशनल मॅरेथॉन' आयोजित केली. ही भारतातील पहिली आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन मानली जाते, जी आजही पुण्यात सातत्याने आयोजित केली जाते. म्हणूनच, पुण्याची सांस्कृतिक आणि क्रीडानगरी अशी ओळख प्रस्थापित करण्यातील त्यांचा वाटा नाकारता येणार नाही. पुणेकरांनीही त्यांच्या उपक्रमांना भरभरून प्रतिसाद दिला. यातूनच पुण्याच्या राजकीय अवकाशात त्यांनी उंच गवसणी घेतली. ते काहींना रुचले नाही. त्यामुळेच, त्यांची भरारी अनैसर्गिक पद्धतीने काही उपद्रवी नेत्यांक़डून थांबवण्यात आली. त्या काळात राजकारण आणि क्रीडा यांचा मेळ घालणारे नेते फारसे नव्हते; त्या अर्थाने कलमाडी हे वेगळ्या धाटणीचे नेते होते. मात्र, त्यांच्या आयुष्याचा आणि राजकीय कारकिर्दीचा मध्यबिंदू ठरला तो कॉमनवेल्थ क्रीडा स्पर्धांतील कथित घोटाळा. या प्रकरणामुळे त्यांची प्रतिमा एका क्षणात बदलली. २५ एप्रिल २०११ रोजी सीबीआयने त्यांना अटक केली. त्यानंतर, पक्षातून निलंबन आणि दीर्घकाळ चाललेली न्यायालयीन प्रक्रिया यामुळे पुण्याचा सर्वेसर्वा म्हणून ओळखला जाणारा सुरेशभाई कलमाडी हा नेता अचानक राजकीय परिघाबाहेर फेकला गेला. पंधरा वर्षांनंतर त्यांना क्लीन चिट मिळाली, पण तोपर्यंत राजकारणाने त्यांच्यापासून फारकत घेतली होती. न्यायालयीन निकालाने कायदेशीर दिलासा मिळाला असला, तरी या सर्व प्रकरणामुळे त्यांचे झालेले राजकीय आणि नैतिक नुकसान भरून न येण्यासारखेच होते. कलमाडी यांच्या कारकिर्दीतून राजकारणातील एक कठोर सत्य समोर येते. आरोप खोटे ठरले, तरी त्यातून बाहेर येईपर्यंत राजकीय कारकिर्द संपुष्टात येते. न्यायालयीन प्रक्रियेचा कालावधी आणि जनमताची असहिष्णुता यांचा मेळ बसत नाही. कलमाडी यांचा प्रवास हा एका व्यक्तीचा नाही, तर आपल्या व्यवस्थेतील उणिवांचाही तो आरसा आहे. त्यांच्या निधनानंतर स्वाभाविकपणे टोकाच्या प्रतिक्रिया उमटतील. काही जण त्यांना विकासाचे शिल्पकार मानतील, तर काही जण कॉमनवेल्थ घोटाळ्याच्या चष्म्यातून त्यांना पाहतील. सत्य या दोन्हींच्या मध्ये आहे. कलमाडी यांच्यात नेतृत्व होते, दूरदृष्टी होती. तथापि, व्यवस्थेवर अति विश्वास ठेवण्याची चूक त्यांना मोजावी लागली. सुरेश कलमाडी यांचे जीवन यश, सत्ता, वाद आणि राजकीय विजनवासाची कहाणी आहे. पुण्याच्या सार्वजनिक जीवनात त्यांनी जे स्थान निर्माण केले, ते महत्त्वाचे होते. पण त्याचा शेवट ज्या चुकीच्या पद्धतीने झाला, तो अनेकांसाठी इशारा देणारा आहे. राजकारणात उंची गाठणे जितके कठीण असते, तितकेच ती टिकवणे आणि सन्मानाने निरोप घेणेही अवघड असते, हे त्यांच्या आयुष्याने पुन्हा एकदा अधोरेखित केले. त्यांच्या निधनाने एक युग संपले; पण त्यांच्याभोवतला वाद, चर्चा आणि त्यातून मिळालेले धडे मात्र दीर्घकाळ स्मरणात राहतील.

# महाराष्ट्राची सेमीकंडक्टर क्षेत्रात झेप

**महाराष्ट्र सेमीकंडक्टर उत्पादन क्षेत्रात उतरण्याच्या तयारीत असून, ही बाब राज्याच्या औद्योगिक धोरणातील महत्त्वाची घडामोड ठरणार आहे. जागतिक तंत्रज्ञान साखळीत या उद्योगाचे वाढते महत्त्व पाहता, स्वदेशी क्षमता उभारण्याची गरज अधिक तीव्र झाली आहे.**



महाराष्ट्र सेमीकंडक्टर उत्पादन क्षेत्रात मोठी झेप घेण्याच्या तयारीत आहे, ही बाब औद्योगिक धोरणापुरती मर्यादित नसून राज्याच्या दीर्घकालीन आर्थिक आणि तंत्रज्ञानविषयक दिशेचे ती द्योतक मानावी लागेल. जागतिक अर्थव्यवस्थेत सेमीकंडक्टर हा कणा ठरत असताना, भारतासारख्या आयात-निर्भर देशासाठी स्वदेशी उत्पादन क्षमता निर्माण करणे ही गरज नव्हे, तर अपरिहार्यता बनली आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राची भूमिका, त्याची धोरणात्मक तयारी आणि त्यामधील आव्हाने यांचे विश्लेषण महत्त्वाचे ठरते. सेमीकंडक्टर उद्योग हा पारंपरिक उत्पादन क्षेत्रांपेक्षा वेगळा आहे. येथे भांडवली गुंतवणूक प्रचंड असते, तंत्रज्ञान वेगाने बदलते आणि मनुष्यबळ अत्यंत कुशल असणे आवश्यक असते. त्यामुळे कोणतेही राज्य या क्षेत्रात उतरताना केवळ जमिनीचे वाटप किंवा आर्थिक सवलती यापुरते धोरण मर्यादित ठेवू शकत नाही. महाराष्ट्राच्या धोरणात्मक चौकटीकडे पाहिले असता, राज्याने ही बाब काही अंशी ओळखली असल्याचे दिसते. इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन, डिझाइन, चाचणी, असेंब्ली आणि संशोधन या संपूर्ण साखळीचा विचार करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. महाराष्ट्राची मोठी ताकद म्हणजे येथे आधीपासून अस्तित्वात असलेले औद्योगिक आणि शैक्षणिक पर्यावरण. पुणे, मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजीनगर या शहरांमध्ये तंत्रज्ञानाधारित उद्योग, अभियांत्रिकी शिक्षण संस्था आणि संशोधन केंद्रे आहेत. सेमीकंडक्टर डिझाइन, व्हीएलएसआय, एम्बेडेड सिस्टिम्स या क्षेत्रांमध्ये महाराष्ट्रातील मनुष्यबळ आधीपासून कार्यरत आहे. त्यामुळे उत्पादनाच्या पुढील टप्प्याकडे वाटचाल करण्यासाठी आवश्यक असलेली मानवी क्षमता पूर्णपणे शून्यापासून उभारावी लागत नाही, ही राज्यासाठी मोठी जमेची बाजू आहे. मात्र, धोरणांच्या अंमलबजावणीचा प्रश्न येथे केंद्रस्थानी येतो. सेमीकंडक्टर धोरण जाहीर करणे, गुंतवणूकदारांशी सामंजस्य करार करणे आणि प्रत्यक्षात प्रकल्प उभे राहणे यामध्ये मोठा कालावधी जातो. या काळात धोरणातील सातत्य, प्रशासकीय निर्णयक्षमता आणि विविध विभागांमधील समन्वय अत्यंत महत्त्वाचा ठरतो. महाराष्ट्राचा अनुभव पाहता, औद्योगिक धोरणे जाहीर करण्यात राज्य नेहमीच आघाडीवर राहिले असले, तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या टप्प्यावर विलंब, स्थानिक अडथळे आणि निर्णय प्रक्रियेतील गुंतागुंत यामुळे अनेक प्रकल्प संथगतीने पुढे सरकले आहेत. सेमीकंडक्टरसारख्या स्पर्धात्मक क्षेत्रात ही बाब राज्यासाठी घातक ठरू शकते. धोरणात्मक पातळीवर आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे संसाधन व्यवस्थापन. सेमीकंडक्टर उत्पादनासाठी मोठ्या प्रमाणात पाणी, वीज आणि स्थिर पायाभूत सुविधा लागतात. महाराष्ट्रात पाणीटंचाईचे प्रश्न अनेक भागांत तीव्र आहेत. अशा परिस्थितीत उद्योग आणि स्थानिक गरजा यांचा समतोल राखणे ही मोठी कसरत ठरणार आहे. धोरणांमध्ये पर्यावरणीय शाश्वततेचा उल्लेख असला, तरी प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी कशी केली जाणार, याबाबत स्पष्टता आवश्यक आहे. अन्यथा हा उद्योग सामाजिक विरोधाचा विषय ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. कौशल्य विकासाच्या बाबतीतही धोरणात्मक दृष्टिकोन महत्त्वाचा आहे. सेमीकंडक्टर उद्योग केवळ उच्चशिक्षित अभियंत्यांपुरता मर्यादित नसून, तंत्रज्ञ, ऑपरेटर, देखभाल कर्मचारी अशा विविध स्तरांवरील कुशल मनुष्यबळाची गरज असते. महाराष्ट्राने या दृष्टीने आयटीआय, पॉलिटेक्निक आणि अभियांत्रिकी महाविद्यालये यांच्यातील अभ्यासक्रम आणि उद्योगाच्या गरजा यामध्ये सुसूत्रता निर्माण करणे आवश्यक आहे. अन्यथा केवळ पदवीधरांची संख्या वाढेल, पण उद्योगाला लागणारे नेमके कौशल्य उपलब्ध होणार नाही. राज्याच्या धोरणांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे केंद्र सरकारच्या योजनांशी समन्वय साधण्याचा प्रयत्न. सेमीकंडक्टर उद्योग हा केवळ राज्याच्या कुवतीवर उभा राहणारा नसून, त्यासाठी केंद्र आणि राज्य यांच्यात घनिष्ठ सहकार्य आवश्यक आहे. महाराष्ट्राने या सहकार्याचा लाभ घेतला, तर गुंतवणूक आकर्षित करणे सोपे होईल. मात्र, इतर राज्यांशी असलेली स्पर्धा लक्षात घेता, धोरणात्मक स्पष्टता आणि जलद निर्णयक्षमता हीच महाराष्ट्राची खरी कसोटी ठरणार आहे. एकूणच पाहता, सेमीकंडक्टर उत्पादन क्षेत्रात उतरण्याचा महाराष्ट्राचा निर्णय हा योग्य वेळी घेतलेला आणि भविष्योन्मुख आहे. मात्र, केवळ घोषणांवर किंवा काही प्रकल्पांपुरते समाधान मानून चालणार नाही. धोरणांची सातत्यपूर्ण अंमलबजावणी, संसाधनांचा समतोल वापर, कौशल्य विकासाची ठोस योजना आणि प्रशासकीय गती या चार घटकांवर या क्षेत्राचे यश अवलंबून राहील. हे साध्य झाले, तर महाराष्ट्र केवळ उद्योग आकर्षित करणारे राज्य न राहता, देशाच्या तंत्रज्ञानात्मक स्वावलंबनात निर्णायक भूमिका बजावणारे राज्य ठरू शकते.

## पुणेकरांचा प्रवास होणार अधिक सुखकर!

### 60 नवीन रेल्वे, 6 नवे फलाट, सॅटेलाईट टर्मिनलसह पुणे रेल्वे स्थानकाचा कायापालट

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे :** पुणेकरांसाठी मोठी आनंदाची बातमी असून, येत्या पाच वर्षांत पुणे रेल्वे स्थानकाचा सर्वांगीण कायापालट करण्यात येणार आहे. या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत 60 नवीन रेल्वे गाड्या, 6 अतिरिक्त फलाट, सॅटेलाईट स्थानके आणि टर्मिनल उभारणीसह प्रवाशांच्या सोयीसाठी अनेक मोठे बदल करण्यात येणार आहेत. या सुधारणांमुळे पुणे रेल्वे स्थानकाची प्रवासी हाताळण्याची क्षमता दुपटीने वाढणार असून, प्रवास अधिक सुलभ व आरामदायी होणार आहे.

सध्या पुणे रेल्वे स्थानकावरून सुमारे 50 रेल्वे गाड्या धावतात. मात्र, नवीन योजनेनुसार पुढील पाच वर्षांत तब्बल 60 नवीन रेल्वे गाड्या सुरू करण्यात येणार असून, एकूण गाड्यांची संख्या 110 वर पोहोचणार आहे. त्यामुळे पुणे हे रेल्वे जाळ्याचे अधिक महत्त्वाचे केंद्र ठरणार आहे. वाढत्या प्रवासी संख्येचा विचार करता, नवीन फलाटांची उभारणी तसेच विद्यमान फलाटांची लांबी वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

रेल्वे प्रशासनाकडून पुणे रेल्वे स्थानकावर 6 अतिरिक्त फलाट बांधण्याचे काम हाती घेतले जाणार आहे. यासोबतच 75 रेल्वे गाड्यांना एकूण 198 अतिरिक्त डबे जोडले जाणार आहेत. या नव्या सुविधांमुळे दररोज सुमारे 15 हजार अतिरिक्त प्रवाशांना प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे. गर्दी कमी होऊन प्रवाशांना सुरक्षित व सोयीस्कर प्रवासाचा अनुभव मिळेल, असा विश्वास रेल्वे प्रशासनाने व्यक्त केला आहे.

पुणे रेल्वे स्थानकावर जागेची मर्यादा लक्षात घेता, दोन नवीन सॅटेलाईट रेल्वे स्थानके उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच पुण्यासह आळंदी, उरुळी आणि फुरसुंगी या ठिकाणी नवीन टर्मिनल विकसित करण्यात येणार आहेत. यामुळे गाड्यांचे नियोजन सुलभ होईल आणि मुख्य पुणे स्थानकावरील ताण मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

फक्त पुणेच नव्हे तर पुण्याच्या आजूबाजूच्या रेल्वे स्थानकांचाही विकास करण्यात येणार आहे. हडपसर रेल्वे स्थानकाचा विस्तार करून तेथे 3 नवीन फलाट उभारले जाणार आहेत. तर खडकी रेल्वे स्थानकाची लांबी 3 ते 4 डब्यांनी वाढवली जाणार असून, त्यामुळे तेथेही अधिक गाड्या थांबू शकतील.

दरम्यान, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी देशभरातील 48 प्रमुख रेल्वे स्थानकांच्या क्षमतेत वाढ करण्याचा निर्णय जाहीर केला असून, त्यामध्ये महाराष्ट्रातील मुंबई, पुणे आणि नागपूर रेल्वे स्थानकांचा समावेश आहे. या योजनांमुळे पुणेकरांचा रेल्वे प्रवास अधिक वेगवान, सुरक्षित आणि आरामदायी होणार असून, शहराच्या वाहतूक व्यवस्थेला मोठा दिलासा मिळणार आहे.

## ठाकरेंना पुण्यात मोठा धक्का; कोथरुडमध्ये 'मशाल' विझली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत पुण्यातील कोथरुड विधानसभा मतदारसंघात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाला मोठा राजकीय धक्का बसला आहे. प्रभाग क्रमांक ९ आणि ११ मधील उबाठा गटाचे अधिकृत तसेच बंडखोर उमेदवारांनी शेकडो कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केल्याने कोथरुडमधील 'मशाल' अक्षरशः विझल्याचे चित्र निर्माण झाले आहे. या घडामोडीमुळे भाजप व महायुतीची ताकद लक्षणीयरीत्या वाढली असून, निवडणूक समीकरणे पूर्णतः बदलली आहेत.

राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. प्रभाग क्रमांक ९ मधील उबाठा गटाचे बंडखोर उमेदवार महेश सुतार व पूजा सुतार, तसेच नियोजन समितीचे सदस्य सुखदेव तापकीर यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. त्याचप्रमाणे प्रभाग क्रमांक ११ मधून उबाठा गटाचे अधिकृत उमेदवार बाळासाहेब धनवडे, विद्यार्थी सेनेचे अमर गायकवाड आणि माजी नगरसेवक पैलवान दिलीपदादा गायकवाड यांनीही आपल्या समर्थकांसह भाजपचा झेंडा हाती धरत महायुतीच्या उमेदवारांना उघड पाठिंबा जाहीर केला. या पक्षप्रवेशामुळे कोथरुडमधील उबाठा गटाला मोठे खिंडार पडले असून, ऐन निवडणुकीच्या तोंडावर उमेदवार व कार्यकर्त्यांनी साथ सोडल्याने ठाकरे गटाच्या अडचणी वाढल्या आहेत. दुसरीकडे भाजपने या संधीचा पुरेपूर फायदा घेत कोथरुडमध्ये आपले संघटन अधिक मजबूत केले आहे. चंद्रकांतदादा पाटील यांनी पुण्यातील आपल्या निवासस्थानी सर्व नूतन सदस्यांचे स्वागत केले. यावेळी ते म्हणाले, "कोथरुडमध्ये भाजपचे दोन उमेदवार आधीच बिनविरोध निवडून आले आहेत. आता या महत्त्वाच्या पक्षप्रवेशांमुळे भाजपच्या विजयावर शिक्कामोर्तब झाले आहे.

### भरदिवसा ज्येष्ठ नागरिकाला चाकूच्या धाकाने लुटले

**पुणे :** सदाशिव पेठेतील लिमयेवाडी परिसरात भरदिवसा ज्येष्ठ नागरिकाला धमकावून लुटल्याची घटना घडली. रविवारी सकाळी पावणेनऊच्या सुमारास दुचाकीवरून आलेल्या दोन चोरट्यांनी ६१ वर्षीय नागरिकाला अडवून चाकू असल्याचा धाक दाखवला. त्यानंतर रोख रक्कम व सोन्याची अंगठी असा सुमारे ४२ हजारांचा ऐवज लुटून आरोपी पसार झाले. याप्रकरणी विश्रामबाग पोलिसांनी दोन तरुणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

## ठेकेदारांच्या बस ठरताहेत पीएमपीची डोकेदुखी; अपघातांत अव्वल

### वाढत्या अपघातांमुळे पीएमपीची प्रतिमा मलीन; बेशिस्त चालकांवर कठोर कारवाईचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपीएमएल) ताफ्यात स्वमालकीच्या बसच्या तुलनेत ठेकेदारांच्या बसचे अपघातांचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढले आहे. या अपघातांमुळे प्रवासी सेवेवर थेट परिणाम होत असून बससेवेचे नियोजनही कोलमडत आहे. वारंवार होणाऱ्या दुर्घटनांमुळे पीएमपी महामंडळाची प्रतिमा धोक्यात आली असल्याने, बेशिस्त व निष्काळजी वाहनचालकांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा पीएमपीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक पंकज देवरे यांनी दिला आहे. यासंदर्भात सोमवारी सर्व ठेकेदारांना परिपत्रक पाठविण्यात आले आहे.

डिसेंबर महिन्यात पिंपरी-चिंचवड हद्दीतील तळवडे–निगडी रस्त्यावर पीएमपी बसच्या अपघातात नऊ वर्षीय मुलीचा मृत्यू झाला, तर तिच्या दोन बहिणी गंभीर जखमी झाल्या होत्या. याशिवाय कर्वे रस्ता–नळ स्टॉप परिसरात पीएमपी बसच्या धडकेत एका रिक्षाचालकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. यासोबतच किरकोळ अपघातांच्या घटना सातत्याने घडत असल्याने पीएमपी बसचालकांच्या सुरक्षितता, शिस्त आणि वाहतूक नियमांच्या पालनाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

या पार्श्वभूमीवर सोमवारी सर्व आगार प्रमुखांसोबत बैठक घेण्यात आली. या बैठकीत बसचालकांनी मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करणे, विशेषतः ठेकेदारांच्या बसच्या बाबतीत अधिक गांभीर्याने लक्ष देणे, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या. प्रवाशांचे प्राण धोक्यात येतील अशा प्रकारची कोणतीही निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही, असा ठाम इशाराही यावेळी देण्यात आला.

## 'कृत्रिम बुद्धिमत्तेचा शैक्षणिक उपयोग' विषयावर राष्ट्रीय परिषद

### शिक्षण, संशोधन व क्रीडा क्षेत्रात एआयमुळे प्रगतीला वेग; महात्मा फुले महाविद्यालयात तज्ज्ञांचे मत

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी येथे शारीरिक शिक्षण, मानसशास्त्र व ग्रंथालय विभागांच्या संयुक्त विद्यमाने 'कृत्रिम बुद्धिमत्तेचा शैक्षणिक उपयोग' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. देशातील विविध राज्यांतून प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग या परिषदेला लाभला.

परिषदेचे उद्घाटन प्रो. डॉ. सुदाम शेळके यांच्या हस्ते झाले. उद्घाटनपर भाषणात त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे शिक्षण, संशोधन आणि क्रीडा क्षेत्रातील कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल होत असून, गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी एआय महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे मत व्यक्त केले. त्यानंतर मा. डॉ. मन्मत घरोटे यांनी दैनंदिन जीवनातील योगाचे महत्त्व विशद करत मानसिक आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी नियमित योगाभ्यास आवश्यक असल्याचे सांगितले. परिषदेच्या दुसऱ्या सत्रात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पब्लिकेशन इथिक्स विभागाचे मा. प्रो. अनंत साबणे यांनी संशोधनामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराचे फायदे व मर्यादा यावर सविस्तर मार्गदर्शन केले. संशोधन करताना संदर्भ मांडणी व नैतिक मूल्यांचे पालन करणे अत्यावश्यक असल्यावर त्यांनी विशेष भर दिला. तिसऱ्या सत्रात मा. डॉ. महेश खेतमल यांनी क्रीडा क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, कामगिरी विश्लेषण आणि खेळाडूंच्या क्षमतेच्या विकासातील त्याचे योगदान याबाबत सखोल माहिती दिली.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नरेंद्र देशमुख यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचे महत्त्व, विविध क्षेत्रांतील उपयोग व त्याच्या मर्यादा यावर मार्गदर्शन केले. खुल्या सत्रात सहभागी अभ्यासकांनी आपले शोध निबंध सादर केले. या सत्रासाठी प्रो. (डॉ.) बी. एम. पानगे, डॉ. अभय शालिग्राम, डॉ. विद्या पठारे, डॉ. सुरेखा ढापरे यांनी सत्राध्यक्ष म्हणून काम पाहिले.

परिषदेच्या अध्यक्षस्थानी प्रो. (डॉ.) पांडुरंग भोसले होते. परिषदेत प्रो. (डॉ.) दत्तात्रय हिंगणे, प्रो. (डॉ.) कामायनी सुर्वे, प्रा. डॉ. नीलकंठ डहाळे, प्रो. (डॉ.) संजय मेस्त्री, डॉ. राजेश बिराजदार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. बी. व्होक विभागाचे प्रा. दत्तात्रय बिडबाग व त्यांच्या चमूने तांत्रिक सहाय्य केले. परिषदेचे संयोजन प्रा. डॉ. पांडुरंग लोहोटे, प्रा. डॉ. एस. बी. गाडकवाड व डॉ. तृप्ती अंब्रे यांनी केले.

## आर्थिक वादातून तरुणाचे अपहरण; विवस्त्र करून अमानुष मारहाण

### पुण्यात दोन गंभीर गुन्ह्यांमुळे खळबळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुण्यात आर्थिक व्यवहारातून उफाळलेल्या वादातून एका तरुणाचे अपहरण करून त्याला विवस्त्र करत बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. आरोपींनी या अमानुष कृत्याचे मोबाइलमध्ये चित्रीकरण करून ते सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी दिल्याने शहरात खळबळ उडाली आहे.

कात्रज–कोंढवा रस्त्यावरील गोकुळनगर परिसरात ही घटना घडली असून, येवलेवाडी पोलीस ठाण्यात नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोंढवा परिसरात राहणाऱ्या 31 वर्षीय वाहन खरेदी-विक्री व्यवसाय करणाऱ्या तरुणाने याबाबत तक्रार दिली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, तक्रारदार व आरोपी एकमेकांच्या ओळखीचे असून, आर्थिक व्यवहारातून त्यांच्यात वाद सुरू होता. 31 डिसेंबर रोजी रात्री सुमारे 11 वाजता आरोपींनी तक्रारदाराला मारहाण करून जबरदस्तीने कारमध्ये बसवले व अपहरण केले. त्यानंतर त्याला गोकुळनगर येथील मोकळ्या मैदानात नेऊन विवस्त्र करून बेदम मारहाण करण्यात आली. या वेळी पिस्तुलातून गोळ्या झाडत दहशत निर्माण केल्याचाही आरोप आहे. भीतीपोटी तक्रारदार काही दिवस गप्प राहिला होता; मात्र रविवारी त्याने पोलिसांकडे धाव घेतली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमर काळंगे यांनी घटनास्थळी भेट देत तपासाला गती दिली आहे. दरम्यान, शहरात दुसऱ्या घटनेत गुन्हे शाखेने भरदिवसा सराफी पेढीवर दरोडा टाकणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### अवसरी खुर्द येथे पती-पत्नीवर मधमाशांचा हल्ला; दोघेही जखमी



**अवसरी खुर्द :** (ता. आंबेगाव) येथे खंडोबा मंदिर बैलगाडा शर्यती घाटाजवळ पायी फिरायला गेलेल्या पती-पत्नीवर आग्या मोहळाच्या मधमाशांनी हल्ला केल्याची घटना घडली. सलून व्यावसायिक राजेंद्र क्षीरसागर व त्यांची पत्नी सुवर्णा क्षीरसागर यांच्या तोंडावर, हात-पायांवर मधमाशांनी मोठ्या प्रमाणात चावे घेतल्याने सूज आली. दोघांवर अवसरी येथील खाजगी रुग्णालयात उपचार करण्यात आले असून सध्या त्यांची प्रकृती स्थिर आहे.

### सेवानिवृत्त शिक्षक राजीव मांढरे यांचे निधन



**शिक्रापूर :** (ता. शिरुर) येथील सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक राजीव जयवंतराव मांढरे (वय ६१) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. त्यांनी तब्बल ३५ वर्षे शिक्षक म्हणून सेवा बजावत शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, दोन मुली, एक मुलगा, भाऊ, वहिनी, पुतण्या व पुतणी असा परिवार आहे.

### शिक्रापूर पोलीस स्टेशनची विद्यार्थ्यांनी घेतली माहिती

**शिक्रापूर :** शिक्रापूर (ता. शिरूर) येथील पोलीस स्टेशनमध्ये पोलीस दलाच्या वर्धापन दिनानिमित्त विद्याधाम प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी भेट देत पोलीस कामकाजाची माहिती घेतली. पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांनी तक्रार नोंद, कायदा-सुव्यवस्था, डायल ११२ तसेच रायफल, पिस्तूल, एअरगन यांचा उपयोग समजावून सांगितला. शस्त्रे प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळाल्याने विद्यार्थी आनंदित झाले.

नगराध्यक्ष पदाच्या विजयानंतर शिवसेना शिंदे गटाचा आत्मविश्वास दुणावला; नगरपरिषद निकालानंतर

# जुन्नर तालुक्याच्या राजकारणाला नवे वळण!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**जुन्नर :** नगरपरिषद निवडणुकीचे निकाल जाहीर होताच जुन्नर तालुक्यातील राजकारण अधिकच तापले असून, आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सत्तासमीकरणे वेगाने बदलताना दिसत आहेत. नगराध्यक्षपदावर शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवाराला मिळालेल्या विजयामुळे शिंदे गटाचा आत्मविश्वास मोठ्या प्रमाणात वाढला आहे. मात्र, तालुक्याचे आमदार शरद सोनवणे यांच्या सक्रिय नेतृत्वामुळे संपूर्ण तालुक्यात राजकीय हालचालींना वेग आला असून, इच्छुकांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे.

आमदार शरद सोनवणे यांनी विधानसभा निवडणुकीत मिळवलेल्या यशानंतर तालुक्यात सातत्याने जनसंपर्क वाढवत विकासाभिमुख राजकारणाचा आग्रह धरला आहे. रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर लक्ष केंद्रित करत त्यांनी स्थानिक पातळीवर ठोस कामे केली आहेत. गावोगावी भेटी, कार्यकर्त्यांशी थेट संवाद आणि संघटनात्मक बांधणी यामुळे त्यांची राजकीय घोडदौड थांबवणे विरोधकांसाठी मोठे आव्हान ठरत आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे जुन्नर तालुक्यातील राजकीय समीकरणे पूर्णपणे वेगळ्या वळणावर गेल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटातील माजी आमदार अतुल बेनके यांच्यासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. आ मदार शरद सोनवणे यांची वाढती ताकद रोखायची असेल, तर अतुल बेनके यांना गावागावांत संघटन मजबूत करणे, कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करणे आणि थेट जनतेशी संवाद वाढवणे अपरिहार्य ठरणार आहे. अन्यथा जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांत त्यांना कठीण लढत द्यावी लागेल, असे राजकीय जाणकारांचे मत आहे.त्याचबरोबर राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाकडून विधानसभा निवडणूक लढवलेले सत्यशील शेरकर यांच्यासाठीही येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अत्यंत महत्त्वाच्या ठरणार आहेत. शरद पवार गटाला तालुक्यात आपली ताकद टिकवायची आणि वाढवायची असेल, तर सत्यशील शेरकर यांना प्रभावी नेतृत्व दाखवावे लागणार आहे. संघटन मजबूत करणे, कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवणे आणि मतदारांशी थेट संवाद साधणे, यावर त्यांची पुढील वाटचाल अवलंबून राहणार आहे.

दरम्यान, या सगळ्या राजकीय हालचालींमध्ये भाजप पक्ष काहीसा पिछाडीवर गेल्याचे चित्र दिसून येत आहे. जुन्नर तालुक्यासह परिसरात भाजपचा प्रभाव कमी झाल्याची चर्चा असून, बदलत्या राजकीय परिस्थितीत पक्षाला नव्याने रणनीती आखावी लागणार असल्याचे संकेत आहेत.

भाजप नेत्या आशाताई बुचके यांनाही तालुक्यात संघटन मजबूत करण्यावर भर द्यावा लागणार आहे. याशिवाय देवराम लांडे यांनाही आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांत आदिवासी समाजाच्या मतदारांकडून विरोधाचा सामना करावा लागत असल्याचे चित्र आहे. त्यांच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमादरम्यान एका आदिवासी तरुणाचा झालेला मृत्यू हा राजकीयदृष्ट्या लांडे यांना फटका देऊ शकतो, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. ओतूर जिल्हा परिषद गटातही उमेदवार आपापली ताकद पक्षश्रेष्ठींकडे सिद्ध करण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

एकूणच, नगरपरिषद निवडणुकीच्या निकालाने जुन्नर तालुक्यातील राजकारणात नवसंजीवनी आली असून, आमदार शरद सोनवणे यांची मजबूत स्थिती, अजित पवार गटासमोरील आव्हाने, शरद पवार गटाची ताकद सिद्ध करण्याची धडपड आणि भाजपची अडचणीत आलेली भूमिका यामुळे आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका अत्यंत चुरशीच्या आणि निर्णायक ठरणार, यात शंका नाही.

## मकरसंक्रांतला पतंग उडवताना पक्ष्यांची काळजी घ्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**शिक्रापूर :** मकरसंक्रांत सण सर्वत्र उत्साहात साजरा होत असताना शाळकरी मुले व युवकांमध्ये पतंग उडवण्याची लगबग सुरू असते. मात्र, या आनंदात आपल्या देशाची मौल्यवान संपत्ती असलेल्या पक्ष्यांना इजा होऊ नये, याची प्रत्येक नागरिकाने विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. मकरसंक्रांत हा वर्षाच्या सुरुवातीला येणारा महत्त्वाचा सण असून, या दिवशी महिलांकडून वाण वाटप केले जाते, तर लहान मुले व युवक पतंग उडवण्याचा आनंद घेतात. अनेक वेळा पक्ष्यांचे पंख, पाय किंवा मान मांजामध्ये अडकून त्यांना कायमचे अपंगत्व येते, तर काही वेळा त्यांना जीवही गमवावा लागतो. पतंग उडवताना मोकळ्या जागेची निवड करावी, झाडांजवळ पतंग उडवणे टाळावे, तसेच झाडांवर पतंग किंवा मांजा अडकलेला आढळल्यास तो तात्काळ काढून घ्यावा, असे आवाहन संस्थेने केले आहे. यामुळे पक्ष्यांना होणारी हानी टाळता येईल. याशिवाय, एखादा पक्षी मांजामध्ये किंवा झाडीत अडकलेला दिसल्यास त्वरित वनविभाग किंवा जवळच्या प्राणीमित्रांना कळवावे, असेही संस्थेने स्पष्ट केले आहे. निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शेरखान शेख, उपाध्यक्ष अभिजित वाघमारे, सचिव अमर गोडांबे, सहसचिव सुरज वाघमारे, संचालक राहुल तिकुटे व बाळासाहेब मोरे यांनी नागरिकांनी सण साजरा करताना पर्यावरण व पक्ष्यांचे संरक्षण करण्याचे आवाहन केले आहे.

## श्री क्षेत्र लेण्याद्रीत अंगारक संकष्टी चतुर्थीनिमित्त भाविकांची अलोट गर्दी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



२०२६ मधील पहिल्या अंगारक संकष्टीला 'श्री गिरीजात्मज' गणेशाचे दर्शन घेण्यासाठी हजारो भक्तांची उपस्थिती

**जुन्नर :** मंगळवार, दि. ६ जानेवारी २०२६ रोजी अंगारक संकष्टी चतुर्थीनिमित्त अष्टविनायक तीर्थक्षेत्र श्री क्षेत्र लेण्याद्री (ता. जुन्नर) येथे भाविकांची प्रचंड गर्दी उसळली होती. २०२६ या नववर्षातील ही पहिलीच अंगारक संकष्टी चतुर्थी असल्याने आणि या तिथीला विशेष धार्मिक महत्त्व असल्याने पहाटेपासूनच 'श्री गिरीजात्मज' गणपतीच्या दर्शनासाठी हजारो भाविकांनी रांगा लावल्या होत्या. दिवसभर लेण्याद्री परिसरास जणू यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.

या पावन प्रसंगी श्री लेण्याद्री गणपती देवस्थानच्या वतीने पहाटे ५.३० वाजता देवस्थानचे विश्वस्त सदाशिव ताम्हाणे यांच्या हस्ते श्रींचा विधीवत अभिषेक व महापूजा पार पडली. त्यानंतर भाविकांसाठी दर्शन खुले करण्यात आले. अंगारक संकष्टीच्या निमित्ताने श्री गिरीजात्मज गणेशाच्या मूर्तीला तसेच मंदिर परिसरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती, ज्यामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने नटला होता.

देवाच्या नैवेद्यासाठी नाशिक येथील प्रतिक रविंद्र चौधरी तसेच बनकरफाटा येथील संगिता संदीप बनकर व संदीप नारायण बनकर यांनी प्रत्येकी दोन कॅरेट केळींचा प्रसाद अर्पण केला. दिवसभरात सकाळी ६ वाजता, दुपारी १२ वाजता आणि सायंकाळी ६ वाजता महाआरती संपन्न झाली. सायंकाळी चंद्रोदयाच्या वेळी विशेष महाआरती करण्यात आली.

अंगारक संकष्टी चतुर्थीनिमित्त देवस्थान ट्रस्टच्या वतीने दिवसभर विविध धार्मिक विधी राबविण्यात आले. भाविक व पर्यटकांसाठी पिण्याचे पाणी, दर्शन रांगांचे नियोजन, स्वच्छता आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. गर्दी असूनही दर्शन सुलभ व्हावे यासाठी देवस्थान प्रशासनाने योग्य नियोजन केल्याचे दिसून आले.

## यांना 'राष्ट्रीय जीवन गौरव'ने रामदास तांबे सन्मानित

■ दैनिक राज्य लोकतंत्र

शिक्षण व साहित्य क्षेत्रातील दीर्घकालीन योगदानाची राष्ट्रीय स्तरावर दखल

**बनकरफाटा :** ओतूर (ता. जुन्नर) येथील रॉयल एज्युकेशन इंग्लिश स्कूलचे विश्वस्त, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, साहित्यिक आणि अनेक पिढ्यांचे प्रेरणास्थान असलेले प्रा. रामदासजी तांबे यांना काव्यमित्र प्रकाशन संस्था, डेक्कन (पुणे) यांच्या वतीने 'राष्ट्रीय जीवन गौरव' पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. शिक्षण आणि साहित्य क्षेत्रात त्यांनी केलेल्या दीर्घकालीन, निष्ठावंत व मोलाच्या कार्याची दखल घेत हा मानाचा पुरस्कार देण्यात आला आहे.

प्रा. तांबे सरांचे लेखन हे शब्दांची कलात्मक गुंफण असून, प्रत्येक विषयाला साजेसे आणि जीवनाशी निगडित विचार त्यातून मांडले जातात. त्यांच्या लेखनातून जीवनमूल्ये, सामाजिक जाणीव आणि सकारात्मकतेचा सुगंध जाणवतो. त्यामुळेच त्यांचे साहित्य वाचकांच्या मनाला स्पर्श करून जाते आणि विचारप्रवृत्त करते. शिक्षक, परीक्षक, मार्गदर्शक आणि साहित्यिक अशा विविध भूमिकांतून त्यांनी समाजाला दिलेले योगदान अत्यंत उल्लेखनीय आहे. ज्ञान, संस्कार आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाचा ध्यास घेत त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले. अशी ज्ञानसमृद्ध 'ज्ञानगंगा' रॉयल एज्युकेशन इंग्लिश स्कूलमध्ये अखंडपणे प्रवाहित होत असल्याचा सार्थ अभिमान शाळा परिवार व्यक्त करीत आहे.

कोणतेही मोठे यश हे अथक परिश्रम, सातत्य आणि निष्ठावंत समर्पणातूनच मिळते, याची प्रचिती या राष्ट्रीय स्तरावरील सन्मानामुळे पुन्हा एकदा आली आहे. या पुरस्कारामुळे ओतूर परिसरासह संपूर्ण शिक्षण व साहित्य क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## 'आनंदी बाजार' ठरला आकर्षणाचा केंद्रबिंदू

■ दैनिक राज्य लोकतंत्र



अभिनव विद्यालयाच्या उपक्रमातून हजारो रुपयांची उलाढाल; विद्यार्थ्यांना उद्योजकतेचा प्रत्यक्ष अनुभव

**रांजणगाव गणपती :** सरदवाडी (ता. शिरुर) येथील अभिनव विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या 'आनंदी बाजार' उपक्रमाने संपूर्ण परिसराचे लक्ष वेधून घेतले. या उपक्रमात विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागामुळे आणि ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हजारो रुपयांची उलाढाल झाल्याची माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापक शांताराम खामकर यांनी दिली. शिक्षणासोबतच व्यवहारज्ञान, उद्योजकता आणि आत्मविश्वास वाढवणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरला.

या आनंदी बाजारासोबतच आयोजित करण्यात आलेल्या अपूर्व विज्ञान प्रदर्शनालाही मोठी गर्दी झाली. विद्यार्थ्यांनी सादर केलेले नाविन्यपूर्ण वैज्ञानिक प्रयोग, आकर्षक मांडणी आणि कल्पकता यामुळे उपस्थित ग्रामस्थ, पालक आणि पाहुणे भारावून गेले. विविध वैज्ञानिक उपकरणे, प्रयोग, तसेच भाजीपाला आणि खाद्यपदार्थांचे स्टॉल सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला प्रत्यक्ष कृतीची जोड मिळाल्याचे चित्र या प्रदर्शनातून दिसून आले.

या आनंदी बाजाराचे उद्घाटन पंचायत समितीचे माजी सदस्य आबासाहेब सरोदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांकडून विविध भाजीपाला खरेदी करत या अभिनव उपक्रमाचे विशेष कौतुक केले. "विद्यार्थ्यांना लहान वयातच श्रमाचे मोल, व्यवहारज्ञान आणि आत्मनिर्भरतेची शिकवण देणारे असे उपक्रम काळाची गरज आहेत," असे मत त्यांनी व्यक्त केले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी स्वहस्ते तयार केलेल्या खाद्यपदार्थांचे, हस्तकलेच्या वस्तूंचे, भाजीपाल्याचे तसेच दैनंदिन वापरातील विविध उपयुक्त वस्तूंचे स्टॉल उभारले होते. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, जबाबदारीची जाणीव आणि आत्मविश्वास वाढताना दिसून आला. कार्यक्रमाला महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या संघटक तृप्ती सरोदे, उपसरपंच सोमनाथ सरोदे, ग्रामपंचायत सदस्य गणेश सरोदे, उमेश सरोदे, मोनाली कर्डिले, शिल्पा घावटे, कर्डेलवाडीच्या लोकनियुक्त सरपंच लता कर्डीले, युवा उद्योजक दत्तात्रय कुंडलिक, सेवानिवृत्त मुख्याध्यापक अरुण गोरडे, दादाभाऊ घावटे, उद्योजक संतोष सरोदे, रामभाऊ सरोदे, ॲड. प्रविण कर्डिले, गणेश कर्डिले, शिवाजी घावटे यांच्यासह पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, या आनंदी बाजार उपक्रमाचे माजी आमदार तथा म्हसोबा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सूर्यकांत पलांडे यांनी विशेष कौतुक करत विद्यार्थ्यांच्या उपक्रमशीलतेचे अभिनंदन केले. सूत्रसंचालन संदीप सरोदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन खिलारे यांनी मानले.

## करंदीत विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा आविष्कार



■ दैनिक राज्य लोकतंत्र

जे. जे. इंटरनॅशनल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**शिक्रापूर :** करंदी (ता. शिरुर) येथील जे. जे. इंटरनॅशनल स्कूलचे सन २०२५ चे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात पार पडले. या स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना आपल्या सुप्त कलागुणांचे सादरीकरण करण्याची संधी मिळाली असून उपस्थित पालक, मान्यवर आणि ग्रामस्थांना विद्यार्थ्यांच्या कला-प्रतिभेचा मनमुराद आनंद घेता आला.

या कार्यक्रमास केंद्रीय अन्वेषण ब्युरोचे पोलीस उपअधीक्षक सिताराम फंड, पुणे पोलीस उपअधीक्षक रतन ढोकले, अनिमेश अग्रवाल, रुपिनगर एज्युकेशन ट्रस्टचे सचिव पंढरीनाथ जांभळकर, अध्यक्ष तथा बाजार समितीचे माजी सभापती शंकर जांभळकर, उपाध्यक्ष दिलीप ढोकले, संचालक दिव्या जांभळकर, शाळेचे प्राचार्य लक्ष्मिकांत आहेर, समन्वयक सुनीता फुके यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व गणपती वंदनाने करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करत रसिकांची मने जिंकली. नृत्य, नाटिका, देशभक्तीपर गीतांबरोबरच विविध वेशभूषेतून विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचा व आत्मविश्वासाचा प्रभावी प्रत्यय दिला. शिक्षकांनी विशेष मेहनत घेतल्यामुळे विद्यार्थ्यांच्या सादरीकरणात शिस्त, सुसूत्रता आणि सर्जनशीलता दिसून आली.

## मुळशी तालुका पत्रकार संघाच्या हक्काच्या दालनात भव्य प्रवेश

पत्रकार दिनानिमित्त नवे दालन खुले; संघाच्या दीर्घकालीन स्वप्नाला साकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पौड :** मुळशी तालुका पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार दिनाचे औचित्य साधून मुळशी तालुका पत्रकार संघाच्या नवीन, हक्काच्या दालनात अधिकृत प्रवेश करण्यात आला. हा क्षण संघाच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा ठरला असून, अनेक वर्षांपासून जपलेले स्वप्न अखेर प्रत्यक्षात उतरल्याने पत्रकार बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण होते.

या कार्यक्रमाची सुरुवात थोर समाजसुधारक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे गुरु शास्त्रीबुवा यांची प्रतिमा पूजन करून आणि पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. पत्रकारितेच्या मूल्यांना आणि समाजहिताच्या विचारांना अधोरेखित करणारा हा सोहळा साध्या पण अर्थपूर्ण वातावरणात पार पडला.

मुळशी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष विनोद माझिरे यांनी यावेळी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, "मुळशी तालुका पत्रकार संघाचे स्वतःचे, मालकी हक्काचे दालन असावे, ही आमची अनेक दिवसांची इच्छा होती. आज ती इच्छा पूर्ण होत आहे, याचा आम्हा सर्वांना अभिमान वाटतो. या दालनाच्या उभारणीसाठी ज्या-ज्या व्यक्तींनी मदत व सहकार्य केले, त्या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतो." या दालनामुळे पत्रकारांना एकत्र येण्यासाठी, चर्चा, बैठका आणि सामाजिक उपक्रम राबवण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाले असल्याचे त्यांनी नमूद केले.

या प्रसंगी बंडू दातीर, विनोद माझिरे, दीपक सोनवणे, विजय वरघडे, सचिन केदारी, रामदास मानकर, तेजेस जोगावडे, गोरख माझिरे, गणेश अभिमाने यांच्यासह दैनिक पुण्यनगरीचे मुळशी तालुका प्रतिनिधी पप्पू कंधारे आदी पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व उपस्थितांनी नव्या दालनाबद्दल समाधान व्यक्त करत संघाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाला विशेष उपस्थिती लाभली ती पौड पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष गिरिगोसावी यांची. त्यांनी उपस्थित पत्रकारांना लेखणी भेट देत पत्रकार दिनाच्या शुभेच्छा दिल्या. "लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकारांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, समाजात सत्य आणि न्याय पोहोचवण्याचे कार्य पत्रकार सातत्याने करत आहेत,"

## बाजारभाव कोसळले, दाट धुके व अवकाळीचा फटका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आंबेगाव :** तालुक्यासह तालुक्याच्या पूर्व भागात चालू वर्षी मे महिन्यापासून पावसाने जोरदार हजेरी लावल्याने बागायत व जिराई पट्ट्यात सध्या पाण्याची मुबलकता आहे. या अनुकूल परिस्थितीचा लाभ घेत शेतकऱ्यांनी ऊसासोबतच कांदा, बटाटा, बीट, टोमॅटो, धना, मेथी तसेच इतर भाजीपाला पिकांची मोठ्या प्रमाणावर लागवड केली आहे. मात्र, उत्पादन चांगले असले तरी सध्याच्या घडीला शेतकऱ्यांच्या पदरी निराशाच येताना दिसत आहे.

टोमॅटो वगळता इतर सर्वच पिकांचे बाजारभाव अक्षरशः कोसळले आहेत. विशेषतः धण्याचे दर इतके घसरले आहेत की काही शेतकऱ्यांना धना शेतातच सोडून द्यावा लागला, तर काहींनी तो जनावरांच्या चाऱ्यासाठी वापरला. मोठ्या कष्टाने पिकवलेला माल खर्चही वसूल करून देत नसल्याने शेतकरी हतबल झाला आहे. यातच गेल्या पंधरा दिवसांपासून बदलत्या हवामानाने शेतकऱ्यांची चिंता अधिक वाढवली आहे. गेल्या आठ दिवसांपासून या परिसरात सकाळच्या वेळी दाट धुके पडत असून, गेल्या दोन दिवसांत सकाळी साडेसहा ते आठ वाजेपर्यंत इतके दाट धुके पडत आहे की समोरील शंभर फूट अंतरही स्पष्ट दिसत नाही.

अवसरी खुर्द येथे महा अभिषेक, मंत्रमुग्ध महाआरती, विद्युत रोषणाईत न्हालेलं मयुरेश्वर मंदिर

## अंगारकी चतुर्थीनिमित्त मयुरेश्वराच्या दर्शनासाठी भक्तांच्या लांबच लांब रांगा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**अवसरी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील गावोगावी अंगारकी चतुर्थीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम मोठ्या भक्तिभावाने पार पडले. याच पार्श्वभूमीवर अवसरी खुर्द येथील प्रसिद्ध मयुरेश्वर मंदिरात पहाटेपासूनच गणेश भक्तांची मोठी गर्दी उसळली होती. मयुरेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांनी रांगा लावून श्रद्धेने बाप्पाचे दर्शन घेतले.

अंगारकी चतुर्थीनिमित्त मयूर गणेश मंडळाच्या वतीने विशेष धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मंडळाचे अध्यक्ष मनोज काळदंते यांच्या हस्ते पहाटे मयुरेश्वराचा महा अभिषेक करण्यात आला. त्यानंतर मंत्रोच्चार, संगीत भजन आणि भक्तिमय वातावरणात महाआरती संपन्न झाली. पुजारी महेश काका चिंचोडीकर यांच्या मंत्रमुग्ध स्वरातील आरतीने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

मयूर गणेश मंडळाच्या वतीने गेल्या ४० ते ४५ वर्षांपासून दर महिन्याला संकष्ट चतुर्थी तसेच अंगारकी चतुर्थीनिमित्त पहाटेची महापूजा, महाभिषेक आणि भजनाचा कार्यक्रम परंपरेने आयोजित केला जातो. मंगळवार, दिनांक ६ रोजी अंगारकी चतुर्थीनिमित्त मंदिर परिसर विद्युत रोषणाईने उजळून निघाला होता. फुलांची आकर्षक सजावट, दीपमाळा आणि रोषणाईमुळे मयुरेश्वर मंदिराचे रूप अधिकच खुलून दिसत होते.

या वेळी मंडळाचे ज्येष्ठ सभासद हरिदास रामवत, सुदेश खेडकर, सोमकांत खोल्लम, बाळासाहेब गायकवाड, विठ्ठल भोर, शांताराम भालेराव, शामराव शिंदे, रावजी बांगर यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. महाआरतीनंतर भाविक भक्तांनी शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने रांगेत उभे राहून मयुरेश्वराचे दर्शन घेतले.

भाविकांच्या सोयीसाठी मयूर गणेश मंडळाच्या वतीने खिचडी व केळीचे वाटप करण्यात आले. याबाबत माहिती देताना मयूर पतसंस्थेचे चेअरमन हरिदास रामवत यांनी सांगितले की, भाविकांना दर्शनासोबत प्रसाद व अन्नदानाचा लाभ मिळावा, या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला. अंगारकी चतुर्थीच्या या कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन मंडळाचे सभासद शैलेश भालेराव व शुभम बैरागी यांनी केले. सकाळपासून दुपारपर्यंत मंदिर परिसरात भक्तीमय वातावरण कायम होते.

## सारांश वृत्त

### ३.५० कोटींचे अंमली पदार्थ जप्त

**बेंगळुरू :** ड्रग्ज तस्करीच्या आरोपाखाली दोघांना अटक करण्यात आली आणि त्यांच्याकडून ३.५० कोटी रुपयांचे एमडीएमए क्रिस्टल जप्त करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. ३१ डिसेंबर रोजी एका माहिती देणाऱ्याकडून मिळालेल्या माहितीनंतर अशोका नगर पोलिस ठाण्याने कारवाई केली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. होसूर रोडवरील हिंदू स्मशानभूमीजवळ एका व्यक्तीला अटक करण्यात आली. त्याने पोलिसांना सांगितले की, त्याने आणि त्याच्या साथीदाराने नवीन वर्षाच्या उत्सवादरम्यान विक्री करण्याच्या उद्देशाने कमी किमतीत एमडीएमए क्रिस्टल खरेदी केले होते.

### कांगडा प्रशासनाचे ट्रेकिंगवर निर्बंध

**शिमला :** हिमाचल प्रदेशातील कांगडा जिल्ह्याच्या प्रशासनाने जिल्ह्यातील ३००० मीटरपेक्षा जास्त उंचीवरील सर्व ट्रेकिंग क्रियाकलापांवर पूर्ण बंदी घातली आहे, असे अधिकाऱ्यांनी मंगळवारी सांगितले. निर्देश जारी करताना, कांगडा उपायुक्त हेमराज बैरवा म्हणाले की, पर्यटकांच्या सुरक्षिततेचा विचार करून ट्रेकिंगबाबत वेळोवेळी आदेश जारी केले जातात आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने ३,००० मीटरपेक्षा जास्त उंचीवरील सर्व ट्रेकिंग क्रियाकलापांवर पूर्ण बंदी घालण्याचे आदेश जारी केले आहेत. पर्यटकांच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी हवामान बिघडण्यापूर्वी असे आदेश जारी केले जातात, असे प्रशासनाने कळवले आहे.




### व्हॅन दरीत कोसळून ४ जणांचा मृत्यू

**चुराचंदपूर :** मणिपूरच्या चुराचंदपूर जिल्ह्यात मंगळवारी एक पिक-अप व्हॅन दरीत कोसळल्याने तीन महिलांसह चार जणांचा मृत्यू झाला आणि अनेक जण जखमी झाले, असे पोलिसांनी सांगितले. लग्नासाठी भाड्याने घेतलेल्या ट्रकमध्ये सुमारे ३०-४० लोक प्रवास करत होते, असे त्यांनी सांगितले. जिल्ह्यातील सिंगनगत उपविभागातील दुर्गम न्गालजांग गावाजवळ दुपारी १२ वाजताच्या सुमारास हा अपघात झाला, असे त्यांनी सांगितले.

## उमर खालिद आणि शरजील इमामला जामीन नाकारला

# मोदी-शाह विरोधात जेएनयूत निदर्शने

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** २०२० च्या दिल्ली दंगलीतील आरोपी उमर खालिद आणि शरजील इमाम यांना सर्वोच्च न्यायालयाने जामीन नाकारला. त्यानंतर दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठात (जेएनयू) निदर्शने सुरू झाली. कॅम्पसमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या विरोधात निदर्शने ऐकू आली. निदर्शनांचे व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहेत.

व्हायरल व्हिडिओमध्ये डाव्या विचारसरणीचे विद्यार्थी पंतप्रधान मोदी आणि अमित शहा यांच्याविरुद्ध आक्षेपार्ह आणि चिथावणीखोर घोषणा देताना दिसत आहेत. भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते शहजाद पूनावाला यांनी त्यांचा निषेध ट्विट करत लिहिले आहे की, मोदी-शाहची कबर जेएनयूच्या मातीत खोदली जाईल, अशा घोषणा शरजील उमरला जामीन नाकारल्यानंतर जेएनयूमधील इकोसिस्टमने दिल्या आहेत. हा शहरी नक्षलवाद्यांचा भारतविरोधी गट आहे, असा आरोप त्यांनी केला.

एका वृत्तवाहिनीशी बोलताना पूनावाला म्हणाले, काँग्रेसच्या पर्यावरणातील विद्यार्थी आता धमक्या देत आहेत. ते घोषणा देत होते की मोदी आणि शाह यांच्या कबरी जेएनयू कॅम्पसमध्ये खोदल्या जातील. आम्ही काँग्रेसच्या कार्यक्रमांमध्येही अशा घोषणा ऐकल्या आहेत. कल्पना करा ज्यांच्यावर सर्वोच्च न्यायालयाने गंभीर आरोप लावले आहेत आणि प्रथमदर्शनी दहशतवादासाठी जबाबदार असल्याचे आढळले आहे. त्यांना एक वर्ष जामीन मिळू शकत नाही. अशा व्यक्तींचा बचाव करताना आज देशाच्या पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांना जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत, असे ते म्हणाले. २०२० च्या दिल्ली दंगली प्रकरणातील आरोपी उमर खालिद आणि शरजील इमाम यांना जामीन देण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे.

दरम्यान, अभाविपचे उपाध्यक्ष मनीष चौधरी म्हणाले, जेएनयूमध्ये 'अभाविप-आरएसएसची कबर खोदली जाईल' अशा घोषणा देण्यात आल्या. जेएनयूमध्ये अशा घोषणा सामान्य झाल्या आहेत. अभाविप-आरएसएसचे लाखो कार्यकर्ते आहेत. ते लाखो कामगारांसाठी लाखो कबरी खोदण्याबद्दल बोलत आहेत का? न्यू यॉर्कच्या महापौरांनी एका 'दहशतवाद्याला' पत्र लिहून त्याची सुटका करण्याची मागणी केल्याचेही आम्ही पाहिले. उमर खालिद आणि शरजील इमाम यांच्या जामीन अर्जांना फेटाळण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे आम्ही स्वागत करतो, असेही ते म्हणाले. शरजील इमाम आणि उमर खालिद यांच्या समर्थनार्थ जेएनयूमध्ये लावण्यात आलेले घोषणा निंदनीय आहेत. विद्यार्थ्यांनी पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांविरुद्धही घोषणाबाजी केली, जी अत्यंत निंदनीय आहे. जेएनयूमधील ही घटना परदेशी शक्तींचे काम असू शकते. अशा लोकांना हिंमत मिळाली आहे कारण दिल्ली विधानसभेत असे आमदार आहेत जे अशा विद्यार्थ्यांना पाठिंबा देतात. पंतप्रधानांच्या कामाबद्दल आणि धोरणांबद्दल बोलता येते, परंतु देशाविरुद्ध जाणे आणि पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांना धमकावणे अत्यंत निंदनीय आहे, असा आरोप भाजपने केला आहे.

## प्रदुषणाचा त्रास झाल्याने सोनिया गांधी रुग्णालयात

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांना दिल्लीतील सर गंगा राम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. छातीत दुखत होते, त्यामुळे त्यांना रुग्णालयात नेण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती पूर्णपणे सामान्य आहे आणि त्या छातीच्या डॉक्टरांच्या देखरेखीखाली आहेत.

रुग्णालयातील सूत्रांनी सांगितले की, त्या नियमित तपासणीसाठी आल्या आहेत, परंतु त्यांना तीव्र खोकल्याचा त्रास होत आहे. विशेषतः दिल्लीतील वाढत्या प्रदूषणामुळे त्यांना आरोग्याच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. पुन्हा एकदा अशीच समस्या उद्भवण्याची शक्यता आहे. त्या सोमवारी रात्री रुग्णालयात पोहोचल्या आणि सध्या डॉक्टरांच्या देखरेखीखाली आहेत. गेल्या वर्षीच त्या ७९ वर्षांच्या झाल्या.

सर गंगा राम रुग्णालयाचे अध्यक्ष डॉ. अजय स्वरूप यांनी सांगितले की त्यांना श्वास घेण्यास त्रास होत होता. तपासणी केल्यावर असे आढळून आले की त्यांचा दमा थोडासा वाढला आहे, कदाचित हिवाळ्यातील हवामान आणि प्रदूषणामुळे. त्यांना खबरदारीचा उपाय म्हणून दाखल करण्यात आले आहे आणि त्यांच्यावर लक्ष ठेवले जात आहे. सध्या त्यांची स्थिती स्थिर आहे. त्यांना औषधे दिली जात आहेत, ज्याचा त्यांच्या प्रकृतीवर सकारात्मक परिणाम होत आहे. त्यांच्या प्रकृतीचे मूल्यांकन केल्यानंतर, त्यांना एक-दोन दिवसांत रुग्णालयातून सोडण्यात येईल.

सोनिया गांधींना यापूर्वीही प्रदूषणामुळे त्रास सहन करावा लागला आहे. २०२० मध्ये, डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार, त्यांनी दिल्लीच्या प्रदूषणापासून वाचण्यासाठी गोव्याला प्रवास केला. दिल्लीतील हवेची गुणवत्ता सुधारेपर्यंत त्यांना गोव्यातच राहण्याचा सल्ला देण्यात आला. डॉक्टरांच्या मते, प्रदूषणामुळे त्यांची प्रकृती पुन्हा एकदा बिकट झाली आहे आणि त्यांना श्वास घेण्यास त्रास होत आहे.

## गुजरातमधील न्यायालयांना बॉम्बची धमकी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अहमदाबाद :** गुजरातच्या न्यायव्यवस्थेत मंगळवारी बॉम्बस्फोटाच्या धमक्या आल्या, राज्यभरात आरडीएक्स स्फोटांच्या इशाऱ्यांचे ईमेल आले, ज्यामुळे सुरतपासून राजकोटपर्यंत, अहमदाबादपासून भरूचपर्यंत घबराट पसरली. परिणामी, न्यायालयीन कामकाज स्थगित करण्यात आले आणि राज्यव्यापी सुरक्षा कारवाई करण्यात आली. सुदैवाने, कोणतीही स्फोटके सापडली नाहीत.

या धमक्यांमध्ये न्यायालयाच्या आवारात आरडीएक्सने सुसज्ज आत्मघाती बॉम्ब ठेवल्याचा इशारा देण्यात आला होता, ज्यामुळे अधिकाऱ्यांना जलद आणि समन्वित कारवाई करण्यास भाग पाडले गेले. या ईमेलमध्ये लिबरेशन टायगर्स ऑफ तमिळ इलमच्या नावाने जबाबदारी स्वीकारण्यात आली होती. त्यामुळे धोक्याची जाणीव तात्काळ वाढली आणि सुरक्षा एजन्सींना हाय अलर्टवर गेल्या. तुमच्या कोर्टाच्या आवारात तीन आरडीएक्स वापरून एक आत्मघातकी बॉम्ब पेरण्यात आला आहे. स्फोट होण्यापूर्वी दुपारी १.५५ वाजेपर्यंत कोर्ट रिकामे करा, असा इशारा यात देण्यात आला होता.

सुरत, आणंद, राजकोट, अहमदाबाद आणि भरूच येथील कनिष्ठ न्यायालयांना लक्ष्य करण्यात आले होते. भरूच जिल्हाधिकारी आणि गांधीनगर जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयांमध्ये जवळजवळ एकाच वेळी असेच मेल आले. न्यायाधीशांना सतर्क करण्यात आले, पोलिसांना पाचारण करण्यात आले आणि न्यायालयाचे संकुल त्वरित सुरक्षा क्षेत्रात रूपांतरित करण्यात आले. बॉम्ब निकामी करणारे पथक, श्वान पथके, गुन्हे शाखा आणि एसओजी पथके तैनात करण्यात आली. दुपारपर्यंत तपासणी पूर्ण झाली आणि त्यात कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही.

## अमेरिकेला रोखण्यासाठी भारताने पुढाकार घ्यावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** क्युबाचे भारतातील राजदूत जुआन कार्लोस मार्सन अगुइलेरा यांनी व्हेनेझुएलातील अमेरिकेच्या लष्करी कारवाईचा तीव्र निषेध केला. ट्रम्प यांनी गेल्या आठवड्यात मध्यरात्री व्हेनेझुएलावर आक्रमण करून राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांच्या पत्नीला ज्या पद्धतीने अटक केली त्याबद्दल क्युबाच्या राजदूतांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

अमेरिकेला रोखण्यासाठी आणि ग्लोबल साऊथचा आवाज बळकट करण्यासाठी भारतासारख्या देशांनी पुढे येणे अत्यंत महत्त्वाचे




आहे, असेही राजदूत म्हणाले.

अगुइलेरा म्हणाल्या की, कोणताही एक देश अमेरिकेला अशी एकतर्फी पावले उचलण्यापासून रोखू शकत नाही. आंतरराष्ट्रीय समुदायाला अमेरिकेच्या वेडेपणाचा सामना करण्यासाठी एकत्र येण्याचे आवाहन केले. माझ्या मते, व्हेनेझुएलावर अमेरिकेचे लष्करी आक्रमण हा गुन्हा आहे. तो एक दहशतवादी कृत्य आहे. तो संयुक्त राष्ट्रांच्या चार्टर आणि आंतरराष्ट्रीय कायद्यात समाविष्ट असलेल्या सर्व तत्त्वांचे उल्लंघन करतो. हा एका सार्वभौम देशाविरुद्ध एकतर्फी कृत्य आहे, असे त्यांनी म्हटले.

अमेरिकेचे शुल्क, इराणविरुद्धच्या धमक्या आणि लष्करी हल्ल्यांचा उल्लेख करत त्यांनी जागतिक एकतेच्या गरजेवर भर दिला. मला वाटते की कोणीही अमेरिकन लोकांना एकटे थांबवू शकत नाही, असे त्यांनी म्हटले असून, सर्वांनी एकत्र आले पाहिजे. ही एकतेची वेळ आहे, असे आवाहन त्यांनी केले. त्यांनी इशारा दिला की या कृतींमुळे जगाला धोकादायक संकेत मिळाला आहे.

क्युबन राजदूतांनी जागतिक भूराजकीय परिदृश्यात भारताची मध्यवर्ती भूमिका अधोरेखित केली आणि सांगितले की जगाला भारताची गरज आहे. ते म्हणाले की, एक प्रमुख शक्ती म्हणून भारत आवश्यक संतुलन प्रदान करू शकतो आणि सर्व देशांसाठी स्थिर भविष्य सुनिश्चित करू शकतो. मला विश्वास आहे की जागतिक दक्षिणेचा आवाज म्हणून भारताची भूमिका भविष्यात अधिक मजबूत होत राहील. जगाला आवश्यक असलेला संतुलन प्रदान करण्यासाठी आपल्याला भारताची आवश्यकता आहे, असेही त्यांनी सांगितले.

## भारतात व्हेनेझुएलाची परिस्थिती होणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हटले आहे की, व्हेनेझुएलातील परिस्थिती भारतातही उद्भवू शकते. त्यांनी या घटनेवर केंद्र सरकारच्या प्रतिसादावरही टीका केली. अमेरिकेने व्हेनेझुएलात घुसून नेते निकोलस मादुरो यांना अटक केली. मादुरो यांना न्यू यॉर्क न्यायालयात हजर करण्यात आले, जिथे त्यांनी दोषी नसल्याचे सांगितले. अमेरिकेच्या




कारवाईवर भारताने चिंता व्यक्त केली आहे.

चव्हाण म्हणाले, व्हेनेझुएलामध्ये जे घडले ते संयुक्त राष्ट्रांच्या चार्टरच्या विरुद्ध होते. एका निवडून आलेल्या राष्ट्रपतीचे अपहरण करण्यात आले. उद्या कोणत्याही देशासोबत असे काही घडू शकते ही अत्यंत चिंतेची बाब आहे. उद्या भारतासोबतही असे घडू शकते... भारताने व्हेनेझुएलाच्या मुद्द्यावर भूमिका घेतलेली नाही, त्याच्या भूमिकेनुसार बोललेले नाही. रशिया आणि चीनने एक भूमिका घेतली आणि अमेरिकेच्या कृतींवर टीका केली. युक्रेन युद्धातही असेच घडले. आम्ही कोणाचीही बाजू घेतली नाही. इस्रायल आणि हमासच्या मुद्द्यावरही आम्ही कोणाचीही बाजू घेतली नाही. आणि आता पहा, आम्हाला अमेरिकेची इतकी भीती वाटते की जे घडले त्यावर आम्ही टीकाही करत नाही, असे ते म्हणाले.

ट्रम्प प्रशासनाने त्याला पकडण्यासाठी आणि न्यू यॉर्कला प्रत्यार्पणासाठी वापरल्या जाणाऱ्या आरोपांवर, मादुरो सोमवारी पहिल्यांदाच अमेरिकेच्या न्यायालयात हजर झाला. मादुरोने अमेरिकन न्यायालयात दोषी नसल्याचे कबूल केले आणि न्यायाधीशांना सांगितले, मी एक सभ्य माणूस आहे, माझ्या देशाचा राष्ट्रपती आहे, असे माध्यमांनी दिलेल्या वृत्तात नमूद केले आहे.

## कार्तिगाई दीपम वादात मद्रास उच्च न्यायालयाचा

# दिव्यांच्या परवानगीचा आदेश कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**चेन्नई :** मद्रास उच्च न्यायालयाच्या मदुराई खंडपीठाने तिरुपारंकुंद्रम टेकडीवरील दीपथूनवर कार्तिगाई दीपम पेटवण्यास परवानगी देणारा पूर्वीचा आदेश मंगळवारी कायम ठेवला. सार्वजनिक शांततेला धोका निर्माण होईल, हा राज्य सरकारचा युक्तिवाद न्यायालयाने फेटाळून लावत त्यास “काल्पनिक भूत” असे संबोधले. १ डिसेंबर २०२५ रोजी न्यायमूर्ती जी. आर. स्वामीनाथन यांनी दिलेल्या आदेशाचे समर्थन करत खंडपीठाने सिकंदर बदुशा दर्ग्याजवळील दगडी दीपथूनवर विधी करण्यास अनुमती दिली.

न्यायमूर्ती जी. जयचंद्रन आणि के. के. रामकृष्णन यांच्या खंडपीठाने निरीक्षण नोंदवले की, एका विशिष्ट दिवशी देवस्थानमच्या हद्दीतील टेकडीच्या माथ्याजवळील दगडी स्तंभावर दीप लावण्याने सार्वजनिक शांतता भंग होईल, ही भीती अवास्तव आहे. असा गोंधळ होईल, तर तो राज्य प्रायोजित असलाच पाहिजे, असे सूचक मतही न्यायालयाने व्यक्त केले. कोणतेही राज्य राजकीय हेतूंसाठी समाजात तणाव निर्माण करणार नाही, अशी अपेक्षा खंडपीठाने व्यक्त केली.

राज्य सरकार तसेच इतर भागधारकांनी दाखल केलेल्या अपिलांचा निकाल देताना न्यायालयाने दोन्ही समुदायांमध्ये सुसंवाद राखण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली. देवस्थानमने दीपथूनवर दीप प्रज्वलित करावा, मात्र प्रकाशयोजनेदरम्यान जनतेला सोबत नेऊ नये, असे निर्देश देण्यात आले. या विधीत सहभागी होणाऱ्या व्यक्तींची संख्या भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण आणि पोलिसांशी सल्लामसलत करून ठरवावी, तर संपूर्ण कार्यक्रमाचे समन्वय व देखरेख जिल्हाधिकाऱ्यांनी करावी, असेही आदेशात नमूद आहे. स्मारकाच्या जतनासाठी एएसआयने आवश्यक अटी घालाव्यात, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

गर्भगृहातील देवतेच्या सरळ वर नसलेल्या ठिकाणी दीपम लावणे आगमविरोधी आहे, असा कोणताही पुरावा अपीलकर्त्यांनी सादर केलेला नाही, असे खंडपीठाने स्पष्ट केले. दर्ग्याच्या शिखरापेक्षा खाली असलेला, विविध खडकांच्या शिखरावर उभा असलेला दीपथून दीप प्रज्वलनासाठी योग्य ठिकाण असल्याचेही न्यायालयाने नमूद केले. मानव संसाधन आणि सीई कायद्याच्या कलम ६३ ई अंतर्गत चौकशी हा प्रभावी पर्याय नाही, असे मत नोंदवत टी. एन. वक्फ बोर्डाचा हा स्तंभ त्यांचा असल्याचा दावा “रहस्यमय” असल्याचे सांगून फेटाळण्यात आला. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, ही राज्याची भीती समुदायांमध्ये अविश्वास पसरवणारी असल्याची टीकाही न्यायालयाने केली. १ डिसेंबरच्या आदेशाची अंमलबजावणी न झाल्याने दाखल अवमान याचिका अद्याप प्रलंबित असून त्यावर ९ जानेवारी रोजी सुनावणी होण्याची शक्यता आहे.

## 'आयोगाकडून भाजपच्या ॲपचा वापर'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी मंगळवारी असा आरोप केला की, राज्यात सुरू असलेल्या डीप व्होटर रिव्हिजन (एसआयआर) प्रक्रियेत निवडणूक आयोग सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या आयटी सेलने विकसित केलेल्या मोबाईल ॲप्लिकेशनचा वापर करत आहे. दक्षिण २४ परगणा जिल्ह्यातील सागर बेटाच्या त्यांच्या दोन दिवसांच्या दौऱ्याच्या समाप्तीपूर्वी पत्रकारांशी बोलताना बॅनर्जी यांनी निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केला. ममता या गंगासागर मेळ्याच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी तिथे गेल्या होत्या.

मुख्यमंत्री बॅनर्जी यांनी आरोप केला की, एसआयआर करण्यासाठी निवडणूक आयोग सर्व प्रकारच्या अन्याय्य युक्त्यांचा अवलंब करत आहे. ते पात्र मतदारांना 'मृत' म्हणून चिन्हांकित करत आहे आणि वृद्ध, आजारी आणि आजारी लोकांना सुनावणीला उपस्थित राहण्यास भाग पाडत आहे. आयोग एसआयआर प्रक्रियेत भाजपच्या आयटी सेलने विकसित केलेल्या मोबाइल ॲप्सचा वापर करत आहे. हे बेकायदेशीर, असंवैधानिक आणि लोकशाहीविरोधी आहे. हे चालू राहू शकत नाही. असेही त्या म्हणाल्या.

तृणमूल काँग्रेसच्या सुप्रीमोने निवडणूक आयोगावर हे नवीन आरोप केले आहेत, जेव्हा त्यांच्या पक्षाचे खासदार डेरेक ओ'ब्रायन यांनी निवडणूक आयोगाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती, ज्यामध्ये असा दावा करण्यात आला होता की पश्चिम बंगालमध्ये सुरू असलेल्या एसआयआरमध्ये निवडणूक आयोगाने मनमानी आणि प्रक्रियात्मकदृष्ट्या अनियमित कारवाई केली आहे. टीएमसीने आरोप केला आहे की विशेष सघन सुधारणा (एसआयआर) व्यायामामुळे राज्यातील पात्र आणि खऱ्या मतदारांना भेडसावणाऱ्या अडचणींमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे.

मी लोकांना एसआयआरमध्ये सहभागी होताना काळजी घेण्याचे आवाहन करतो. ज्यांना मदतीची गरज आहे त्यांच्यासोबत त्यांनी उभे राहिले पाहिजे. त्यांना मला पाठिंबा देण्याची गरज नाही; फक्त या पद्धतीमुळे अडचणीत असलेल्यांना पाठिंबा द्या, असेही त्या म्हणाल्या.

## पाकला माहिती दिल्याबद्दल अटक

**चंदीगड :** पंजाबमधील पठाणकोटमध्ये एका १५ वर्षीय मुलाला पाकिस्तानी हँडलर्सना संवेदनशील ठिकाणांची माहिती दिल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, मुलाला सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर कट्टरपंथी बनवण्यात आले होते. हा मुलगा पाकिस्तानी लष्करी अधिकाऱ्यांच्या, आयएसआयच्या आणि त्या देशात दहशतवादी मॉड्यूल चालवणाऱ्या आघाडीच्या संघटनांच्या संपर्कात होता, असे पोलिसांनी सांगितले.

## भटक्या कुत्र्यांशी संबंधित याचिकांमुळे आश्चर्य व्यक्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भटक्या कुत्र्यांशी संबंधित प्रकरणांमध्ये दाखल होणाऱ्या याचिकांच्या महापूराबद्दल सर्वोच्च न्यायालयाने आश्चर्य व्यक्त केले आहे. मंगळवारी झालेल्या सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती संदीप मेहता यांनी टिप्पणी केली की, मानवांशी संबंधित प्रकरणांमध्येही कुत्र्यांच्या मुद्द्यावर जितके अंतरिम अर्ज येतात तितके सहसा प्राप्त होत नाहीत. न्यायालयाने आश्वासन दिले की बुधवारी सर्व पक्षांचे युक्तिवाद ऐकले जातील. दोन वकिलांनी भटक्या कुत्र्यांशी संबंधित मुद्दा उपस्थित केला तेव्हा न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने ही टिप्पणी केली.

एका वकिलाने सांगितले की त्यांनी या प्रकरणात अंतरिम अर्ज दाखल केला आहे. यावर न्यायमूर्ती मेहता म्हणाले की, मानवांशी संबंधित प्रकरणांमध्येही इतक्या याचिका सहसा प्राप्त होत नाहीत.

खंडपीठाने सांगितले की, भटक्या कुत्र्यांचा खटला बुधवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणीसाठी येईल. हस्तांतरण याचिकेचा उल्लेख केला तेव्हा सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, बुधवारी अनेक याचिकांवर सुनावणी होईल आणि खंडपीठ सर्व वकिलांचे युक्तिवाद ऐकेल. न्यायमूर्ती विक्रम नाथ, संदीप मेहता आणि एन.व्ही. अंजारिया यांचा समावेश असलेले तीन न्यायाधीशांचे विशेष खंडपीठ बुधवारी या खटल्याची सुनावणी करेल.

## ट्रम्प प्रशासनाने मादुरोचे अपहरण केल्याने

# आंतरराष्ट्रीय कायदेशीर चौकटीबद्दल अस्वस्थता

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धाच्या विध्वंसातून जगाने एक धडा घेतला होता. भविष्यात अशा व्यापक संघर्षांना आळा घालण्यासाठी आंतरराष्ट्रीय नियम, कायदे आणि संस्थांची उभारणी करण्यात आली. संयुक्त राष्ट्रे ही त्याच प्रयत्नांची मध्यवर्ती रचना होती. मात्र न्यू यॉर्कमधील याच संयुक्त राष्ट्रांच्या मुख्यालयाजवळ, व्हेनेझुएलाचे अध्यक्ष निकोलस मादुरो यांना अटक करून अमेरिकन न्यायालयात हजर करण्यात आल्याच्या घटनेने ही संपूर्ण जागतिक व्यवस्था ढासळत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.




संयुक्त राष्ट्रांच्या अंडरसेक्रेटरी-जनरल रोझमेरी ए. डिकार्लो यांनी सुरक्षा परिषदेत स्पष्ट केले की आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता ही सर्व सदस्य राष्ट्रांनी संयुक्त राष्ट्रांच्या चार्टरचे पालन करण्यावर अवलंबून आहे. मात्र अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मादुरोला अटक करणे कायदेशीर असल्याचा आग्रह धरत, ‘शक्तीच योग्य ठरवते’ या जुन्याच सिद्धांताला पुन्हा जागतिक व्यासपीठावर आणले आहे.

ट्रम्प प्रशासनाने व्हेनेझुएलामधील ड्रग्ज कार्टेल्सना बेकायदेशीर लढाऊ घोषित केले असून, मादुरो आणि त्यांची पत्नी सिलिया फ्लोरेस यांना नार्को-दहशतवादाच्या कटात सहभागी असल्याचा आरोप आहे. कराकसमधील लष्करी तळावरून त्यांना पळवून न्यू यॉर्कला आणण्यात आले. अमेरिकेने या कारवाईचे समर्थन ‘शस्त्रक्रिया स्वरूपाची कायदा अंमलबजावणी कारवाई’ म्हणून केले आहे. हे पाऊल ट्रम्प प्रशासनाच्या राष्ट्रीय सुरक्षा धोरणाशी सुसंगत असून, पश्चिम गोलार्धात अमेरिकन वर्चस्व पुन्हा प्रस्थापित करण्याचा त्यांचा उद्देश यातून स्पष्ट होतो.

या घटनेनंतर भविष्यातील अमेरिकी कारवायांबाबत चिंता वाढली आहे. ट्रम्प यांनी कोलंबियाचे अध्यक्ष गुस्तावो पेट्रो यांच्यावरही गंभीर आरोप करत निर्बंध लादले आहेत. चीन, फ्रान्ससह अनेक देशांनी व्हेनेझुएलातील या मोहिमेचा निषेध केला आहे. फ्रान्सचे परराष्ट्र मंत्री जीन-नोएल बॅरोट यांनी ही कारवाई आंतरराष्ट्रीय कायद्याच्या मूलभूत तत्त्वांच्या विरोधात असल्याचे म्हटले आहे.

या घटनेचा परिणाम इतर जागतिक संघर्षांवरही होऊ शकतो. युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर रशियाने अमेरिकेवर आंतरराष्ट्रीय व्यवस्थेला अधिक कमजोर केल्याचा आरोप केला आहे. ग्रीनलँडबाबत ट्रम्प यांनी केलेल्या वक्तव्यांमुळे युरोपमध्ये अस्वस्थता वाढली आहे. तैवानच्या मुद्द्यावर चीनही सावध झाला असून, अमेरिकेच्या अशा कृतींमुळे अनिश्चिततेचा नवा थर निर्माण झाला आहे.

मध्यपूर्वेत गाझा आणि इराण संदर्भातील अमेरिकी भूमिकेमुळे आधीच तणाव वाढलेला असताना, व्हेनेझुएलाची घटना आंतरराष्ट्रीय कायद्याच्या भवितव्याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करते. दुसऱ्या महायुद्धानंतर उभारलेली जागतिक व्यवस्था टिकणार की शक्तिशाली राष्ट्रांच्या निर्णयांपुढे ती निष्प्रभ ठरणार, हा प्रश्न पुन्हा एकदा केंद्रस्थानी आला आहे.